रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३३५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## मतदानासाठी भरपगारी रजा

**रायगड :** जिल्हातील मावळ लोकसभा मतदारसंघात चौथ्या टप्प्यात सोमवार, दि. १३ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, यासाठी अशा सर्व मतदारांना भरपगारी रजा देय असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सर्व आस्थापना प्रमुखांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचारी/रोजंदारी कर्मचारी यांना भरपगारी रजा मंजूर करण्याचे आदेश पुढील शर्ती/अटीस अधिन राहून देय आहे. सदर आदेश हा शासकीय आस्थापना/खासगी आस्थापना/रोजंदारीवरील कर्मचारी पान २ वर


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १२ मे २०२४

किंमत ४ ₹







## दलित, मुस्लीम समाज मोदींविरोधात
# आता सत्तापरिवर्तन अटळ

### आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन

**| खोपोली | प्रतिनिधी |**

देशभरातील दलित, मुस्लीम समाज मोदींविरोधात एकवटला असून, आता सत्तापरिवर्तन अटळ आहे. जनतेने ही निवडणूक हातात घेतली असून, मोदींना सिंहासनावरुन पायउतार केल्याशिवाय आता स्वस्थ बसायचे नाही, असा पण दलित, मुस्लीम समाजाबरोबरच येथील जनतेने केला आहे. त्यामुळे आता भाजपाची हुकूमशाही राजवट उलथवून गद्दारांना धडा शिकवा, अशा शब्दात शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी विरोधकांचा समाचार घेतला. दरम्यान, आ. पाटील यांनी मुस्लीम समाजाच्या देश आणि राज्यपातळीवरील मोदीविरोधी संघटनेचे कौतुक केले.



### बारणेंनी स्वत:चाच विकास केला

खा. बारणे यांनी २०१४ च्या निवडणुकीच्या वेळी नामनिर्देशनपत्रामध्ये दोन कोटी अशी संपत्ती जाहीर केली होती, ती आज दहा वर्षांत दोनशे-अडीचशे कोटींच्या घरात गेल्याचे त्यांनी आता जाहीर केलेल्या संपत्तीवरुन दिसून येते. एवढी संपत्ती यांच्याकडे आली कुठून, असा सवाल आ. जयंत पाटील यांनी केला. खा. बारणे यांनी आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात जनतेचा नव्हे, तर स्वत:चाच विकास केला, हे त्यांनी जाहीर केलेल्या संपत्तीवरुन सिद्ध होते, अशा शब्दात आ. पाटील यांनी बारणेंचा समाचार घेतला.

इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्या प्रचारार्थ खोपोलीतील महाराजा मंगल कार्यालयात सकाळी साडेअकरा वाजता प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हासराव देशमुख, शेकापचे अल्पसंख्याक सेलचे कार्यकर्ते अबू जळगावकर, खोपोलीच्या माजी नगराध्यक्ष पान २ वर

### मुस्लीम समाजाला पहिला सलाम

मोदींविरोधात वातावरण निर्माण करण्याचे श्रेय देशभरातील मुस्लीम समाजाचे आहे. ज्या जिद्दीने आज देशातील मुस्लीम समाज एकवटून काम करीत आहे, ते पाहता ज्यावेळी मोदी त्या सिंहासनावरुन पायउतार होतील, त्याचे श्रेय मुस्लीम समाजाला देऊन त्यांना पहिला सलाम करावा लागेल, असे आ. जयंत पाटील म्हणाले.

## स्वच्छतागृहाला टाळे
# पर्यटकांची गैरसोय

**| कोर्लई | वार्ताहर |**



मुरुड समुद्रकिनाऱ्यावरील नगरपरिषदेच्या स्वच्छतागृहाला गेल्या दोन दिवसांपासून टाळे असल्याने अनेक पर्यटकांची गैरसोय होत आहे. पाण्याची मोटार बंद पडल्याने पाणी उपलब्ध होत नाही, म्हणूनच ठेकेदाराने हे स्वच्छतागृह टाळे लावून बंद केले असल्याचे स्टॉलधारकांनी सांगितले आहे.

मे महिना सुरू असल्याने शनिवारी व रविवारी वीकेंडसाठी पर्यटकांची मुरुडकडे रेलचेल असते. रुपेरी वाळू, निळेशार पाणी, समोरच दिसणारा पद्मदुर्ग किल्ला, किनाऱ्यावर दिसणारी उंच-उंच नारळाची झाडे व एका बाजूला नवाबाचा राजवाडा असे या मुरुडचे सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करत असते. सध्या लोकसभा निवडणुकीचे वारे सर्वत्र वाहत असल्याने पर्यटक तुरळक प्रमाणातच दिसत आहेत. पान २ वर






# प्रचार तोफा थंडावल्या

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**सोमवारी होणार मावळ मतदारसंघात मतदान**

**१२ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती**

**रायगडमधून पाठविणार ८५ एसटी बसेस**

मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या रिंगणात ३३ उमेदवार रिंगणात आहेत.अखेर शनिवारी सायंकाळी चौथ्या टप्प्यातील प्रचाराचा तोफा थंडावल्या असून, सोमवारी (दि.१३) दोन हजार ५६६ मतदान केंद्रात सकाळी सात ते सायंकाळी सहा यावेळेत मतदान होणार आहे. २५ लाख ८५ हजार मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. ही प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सुमारे १२ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मावळ लोकसभा मतदार संघातील निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यासह ३३ उमेदवारांची लढत होणार आहे. गेल्या महिन्याभरापासून प्रचारसभा रॅलीच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न उमेदवारांनी केली आहे.

मावळ मतदारसंघात रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, उरण या तीन तसेच पान २ वर

# पगार थकले, कर्मचाऱ्यांची उपासमार

## एसटी कर्मचारी पगाराविना

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रात्रीचा दिवस करून प्रवाशांना सेवा देणारे एसटी महामंडळाचे कर्मचारी पगाराविना असल्याची माहिती समोर आली आहे. दर महिन्याच्या सात तारखेला होणारे वेतन लांबणीवर गेले आहे. त्यामुळे त्यांना महिन्याचा घरखर्च चालविणे कठीण होऊन बसले आहे.



एसटी महामंडळ रायगड विभागात अलिबाग, पेण, कर्जत, महाड, श्रीवर्धन, माणगाव, मुरूड व रोहा असे आठ आगार असून, १९ बसस्थानके आहेत. विभाग नियंत्रक कार्यालयाच्या अधिपत्याखाली जिल्ह्यातील एसटीचा कारभार चालत आहे.

जिल्ह्यामध्ये ४८० एसटी बसेस असून, दोन हजारांहून अधिक अधिकारी व कर्मचारी काम करीत आहेत. त्यात सुमारे दीड हजार पान २ वर

## कंत्राटी परिचारिकांना वेतनाची प्रतीक्षा

अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयासह जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयात सार्वजनिक आरोग्य सेवांतर्गत गेल्या काही वर्षांपासून बंधपत्रिक कंत्राटी परिचारिकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. मात्र, या परिचारींना मानधन वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहे.

मागील वर्षभरापूर्वी तीन महिन्यांचे मानधन रखडले होते. आता नवीन आर्थिक वर्षाला सुरुवात झाली असूनदेखील मार्चमधील त्यांचे मानधन त्यांना मिळाले नसल्याच्या तक्रारी आहेत. याबाबत संबंधित पान २ वर

> बंधपत्रित कंत्राटी परिचारिकांना दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मानधन दिले जाते. निधी आल्यावर तातडीने मानधन वेतनाच्या स्वरूपात त्यांच्या खात्यात जमा केले जाते. मार्च महिन्यातील रखडलेले मानधन देण्याचा प्रयत्न केला जाईल.
>
> – डॉ. शीतल जोशी, अतिरिक्त शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय







# काँग्रेसनं निर्माण केलं, ते मोदींनी मित्रांना विकले

## ■ प्रियांका गांधींचा हल्लाबोल



**। नंदुरबार । प्रतिनिधी ।**

सर्व सत्ता, साधनं, मोदींकडे आहेत. मग आपण एकटे कसे लढत आहात? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत काय केले? जे काँग्रेसने निर्माण केले, ते मोदींनी मित्रांना विकले, असा हल्लाबोल काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केला. नंदुरबार लोकसभा मतदारसंघातील काँगेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांच्या प्रचारासाठी प्रियांका गांधी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

### काँग्रेसची गॅरंटी, सर्व आश्वासनं पूर्ण करणार

**जे काँग्रेसने निर्माण केले, ते मोदींनी मित्रांना विकले. मोदींनी राज्यातील मोठ्या उद्योगपतींचे १६ लाख करोडचे कर्ज माफ केले. जोवर आवाज बंद होत नाही, तोवर बोलणार आहे. सरकार बदलेपर्यंत बोलत राहणार आहे. काँग्रेसची गॅरंटी, सर्व आश्वासनं पूर्ण करणार आहे. २५ लाखांपर्यंत उपचार मोफत होणार आहेत. परिवारातील सर्वात मोठ्या महिलेच्या खात्यात एक लाख देणार आहोत. जो पदवीधर आहे त्याला आम्ही नोकरी देणार आहोत. ३० लाख पदं भरणार आहोत, अशा घोषणा त्यांनी यावेळी केल्या.**

प्रियांका गांधी म्हणाल्या की, आदिवासींसाठी काँग्रेसने अनेक योजना सुरु केल्या. राहुल गांधी असे नेते आहेत ज्यांनी चार हजार किलोमीटरची यात्रा केली आहे. काँग्रेसचा पाया गांधी विचारांचा आहे. लोकशाहीत जनता सर्वो तोपरी असते. पण, भाजपची विपरीत विचारधारा आहे. आदिवासी संस्कृतीचा आदर भाजप करीत नाहीत, ते संस्कृती बदलण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्यावेळी आदिवासींवर अन्याय होतो, त्यावेळी भाजप गप्प राहते. आदिवासींचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. भाजपने एकमेव आदिवासी मुख्यमंत्री सोरेन जेलमध्ये पाठवले आहेत.

मोदी देशातील गरिबांबद्दल बोलतात एक आणि दुसरे करतात. भाजप सतत आदिवासींचा अपमान करत आहे. देशात २२ लाख आदिवासींना जमीन पट्टे दिले नाहीत. मोदी सांगतात, मी सबरीचा पुजारी आहे. पण देशात शेकडो शबरींचा अपमान केला जातं आहे, तेव्हा मोदी गप्प का राहतात, असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

# शिंदेंना आमदारकी आमच्यामुळे

## विनायक राऊत यांचा मोठा दावा



**। ठाणे । प्रतिनिधी ।**

शिवसेनेचे नेते सतीश प्रधान यांना आमदारकीचे उमेदवारी देण्यात येत होती. परंतु, माझ्या आणि राजन विचारे यांच्या विनंतीवरून बाळासाहेब ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना आमदारकीचे पहिले तिकीट दिले, असा गौप्यस्फोट उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत यांनी केला. बाळासाहेब यासाठी आम्ही माफी मागतो, असेही राऊत म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातील कोपरी भागात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ठाणे लोकसभेचे उमेदवार राजन विचारे यांच्या प्रचारासाठी चौक सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी राऊत बोलत होते. यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यासह इंडिया आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. शिवसेना फोडणाऱ्यांच्या कपाळावर गद्दारीचा शिक्का मारला जाणार असून, पुढची पिढीदेखील त्यांना माफ करणार नसल्याची टीका राऊत यांनी केली. तसेच ही निवडणूक भारत मातेची आहे. ही निवडणूक संविधानाची आहे. ही निवडणूक घटनेची आहे. ही निवडणूक स्वातंत्र्याची असल्याचे राऊत यांनी सांगितले.

यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही विरोधकांवर टीका केली. बाळासाहेब ठाकरे यांनी छोट्यातील छोट्या माणसाला मोठा नेता केला. ज्या ठाण्यावर बाळासाहेबांनी मनापासून प्रेम केले. ज्या ठाण्याला बाळासाहेबांनी आपले मानले. त्याच बाळासाहेबांच्या मातोश्रीवर पहिला खड्डा ठाण्यातच खणला गेला. गद्दारीचा छाप ठाणेकरांच्या डोक्यावर बसला आहे, तो लवकरच मिटवायचा असल्याचे आव्हाड म्हणाले.

## वे|ध|क

### ‘निलेश लंकेचा विजय निश्चित’

**नगर :** अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार निलेश लंके यांच्यासाठी पाथर्डी बाजारतळावर प्रचारसभा झाली. या सभेत दिवंगत नेते आर. आर पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांनी भाषण केलं. एका बाजूला हुकूमशाही आहे आणि दुसऱ्या बाजूला नगर दक्षिणमधले सर्व लोक एकत्रितपणे येऊन लोकशाही टिकवण्यासाठी स्वाभिमानाने उभं राहणं गरजेचं आहे. आपल्या सर्वांचा उत्साह बघितल्यानंतर अनेक ठिकाणाहून माहिती घेतल्यानंतर निलेश लंकेचा विजय होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असंही रोहित पाटील म्हणाले.

### राऊतांचा राज ठाकरेंना टोला

**पुणे :** पुण्यातील मुरलीधर मोहोळ यांच्या जाहीरसभेत राज ठाकरेंनी महायुतीला मतदान करण्याचं आवाहन हिंदू समाजाला केले. त्यानंतर संजय राऊतांनी आक्रमकपणे राज ठाकरेंवर निशाणा साधला. काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मतदान करण्यासाठी मशिदीतून फतवे काढले जातायेत, असा आरोप राज ठाकरे यांनी पुण्यातील सभेत केले. त्यानंतर शिवसनेना नेते संजय राऊत यांनी राज ठाकरे हे महाराष्ट्रद्रोही लोकांसोबत मांडीला मांडी लावून बसलेत, असा घणाघात त्यांनी केला. महाराष्ट्रात आणि देशात सध्या संविधान वाचवण्याची फार मोठी लढाई सुरू असल्याचे ते म्हणाले.

# अभिनय क्षेत्राला पुढील पाच वर्षे ब्रेक

## खा. अमोल कोल्हेंचा निर्णय



**। पुणे । प्रतिनिधी ।**

शिरूर लोकसभा मतदारसंघात गेल्या पाच वर्षांत अनेक कामे केली आहेत. अनेक प्रकल्प मंजूर करून आणले आहेत. माझ्या मतदारसंघात कामे सुरू असलेले व कामे सुरू होणारे प्रकल्प पूर्ण करून घेण्यासाठी वेळ द्यावा लागणार असून, त्यासाठी पुढील पाच वर्षे मालिका क्षेत्रातील अभिनयातून ब्रेक घेण्याचा निर्णय खा.डॉ. अमोल कोल्हे यांनी जाहीर केला आहे.

शिरूरलोकसभामतदारसंघातील अनेक प्रश्न गेल्या पाच वर्षांत आपण मार्गी लावले आहेत. पुणे-नाशिक, तळेगाव-चाकण-शिक्रापूर, पुणे-नगर या महामार्गांच्या कामासाठी आपण तब्बल साडेएकोणीस हजार कोटी रुपयांचा निधी एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या माध्यमातून आणलाय, याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. हे सर्व प्रकल्प मार्गी लावणे गरजेचे आहे, असेही डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले. पंधरा वर्षांत एका व्यक्तीला खासदारकीची संधी दिल्यानंतर पंधरा वर्षांत त्यांनी शिरूर मतदारसंघात एकही मोठा प्रोजेक्ट आला नव्हता. मात्र, माझ्या अवघ्या पाच वर्षांत हे सर्व प्रोजेक्ट आले आहेत, मार्गी लागले आहेत, असे खा. अमोल कोल्हे यांनी सांगितले.

# नवनीत राणांना भाजपने भुंकण्यासाठी सोडलंय

## इम्तियाज जलिल यांचा जोरदार पलटवार





**। छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था ।**

भारतीय जनता पार्टीला काही भुंकणारे लोक हवे आहेत. याअगोदर हैदराबादचे आमदार भुंकण्यासाठी सोडलं होते, आता तो संपलेला आहे, म्हणून या बाईला सोडलं आहे. नवनीत राणा ही चिप मेंटॅलिटीची बाई आहे. तुमचा धर्म आहे, याचा आम्ही आदर करतो. पण, हनुमान चालीसा उद्धव ठाकरे यांच्या घरासमोरच का वाचायची होती. चीप पब्लिसिटी घेण्यासाठी ही कोणत्याही गोष्टीला मोठं करते, अशा शब्दात इम्तियाज जलील यांनी नवनीत राणांवर प्रहार केला.

भाजपा महायुतीच्या उमेदवार आणि खासदार नवनीत राणा यांनी आपल्या भाषणातून आक्रमक पवित्रा घेत एमआयएमच्या ओवैसी बंधुंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. हैदराबादमधील भाजपा उमेदवार लता माधवी यांच्या प्रचारासाठी नवनीत राणांनी भाषण करताना, एमआयएमच्या नेत्यांना लक्ष्य केलं. अकबरुद्दीन ओवैसींच्या भाषणाचा संदर्भ देत, १५ मिनिटांसाठी नाही, केवळ १५ सेकंदांसाठी पोलीस हटवा मग ह्या दोन्ही भावांना कुठून कुठं पळावं हेही कळायंचं नाही, असे नवनीत राणांनी म्हटले होते. त्यानंतर, असदुद्दीन ओवैसींनी नवनीत राणांवर पलटवार केला. मात्र, राणा विरुद्ध एमआयएम असा वाद अद्यापही सुरूच आहे. आता, खासदार इम्तियाज जलील यांनी नवनीत राणांवर शेलक्या शब्दात टीका केली आहे.

# मोदीच एक लटकता आत्मा

## संजय राऊत यांनी फटकारले



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नरेंद्र मोदी हा एक लटकता आत्मा आहे. तो इकडे तिकडे लटकत फिरत आहे. त्या लटकत्या आत्म्यासोबत महाराष्ट्रातील आमचे पवित्र आत्मे कधीच जाणार नाहीत, अशा शब्दांत शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी फटकारले.

मोदींनी दिलेल्या ऑफरसंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर संजय राऊत म्हणाले, मोदींची ऑफर हा बालिशपणा आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि ज्येष्ठ नेते शरद पवार हे आपला स्वाभिमान सोडून आणि राष्ट्रहिताचा बळी देऊन कधीच नरेंद्र मोदींसोबत जाणार नाहीत. मोदींना आता पराभव दिसू लागला आहे. उद्धव ठाकरे व शरद पवार हे मोदींना कधीच घाबरणार नाहीत. जे घाबरणारे होते, ते मोदींसोबत गेले आहेत.

आपण कुठे लटकत आहोत हे मोदींना समजत नाही. मोदींची वक्तव्ये बघा, ते आज एक बोलतात, उद्या एक बोलतात. मला तर वाटतेय नरेंद्र मोदींची प्रकृती बरी नाही. भाजपमधील सहकाऱ्यांनी त्यांची प्रकृती नीट तपासून घ्यावी. मोदींना उपचार आणि विश्रांतीची गरज आहे, असे संजय राऊत यांनी फटकारले.

शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेसारखे पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, असे कुठेही म्हटलेले नाही. काँग्रेस भविष्यात मजबूत पक्ष होईल आणि देशाचे नेतृत्व करेल त्यासंदर्भात शरद पवार बोलले.मोदी हे पराभूत मनोवृत्तीतून बोलताहेत, असे संजय राऊत यांनी सांगितले.

# वाजेंच्या प्रचारार्थ आघाडीच्या तोफा धडाडणार

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

नाशिक लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांचा प्रचार जोरदारपणे सुरू आहे. त्याचा धसका विरोधकांनी घेतला असून, त्यांच्या प्रचारार्थ पुढील आठवड्यात महाआघाडीच्या नेत्यांच्या प्रचाराच्या तोफा धडाडणार आहेत, अशी माहिती शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी दिली.

वाजे यांच्या प्रचारार्थ विविध पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या प्रचारसभांचे नियोजन व प्रचार यंत्रणांचा आढावा घेण्यासाठी महाविकास आघाडीचे पदाधिकाऱ्यांची बैठक शालिमार चौकातील शिवसेना जिल्हा कार्यालयात पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. रविवारी (दि. १२) सुषमा अंधारे यांची देवळाली कॅम्प, मंगळवारी (दि. १४) इम्रान प्रतापगढी आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची चौक मंडई तर बुधवारी (दि. १५) उद्धव ठाकरे यांची अनंत कान्हेरे मैदानावर जाहीर सभा होणार असल्याने त्याचे नियोजन बैठकीत करण्यात आले.

बैठकीस ठाकरे गटाचे सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, महानगरप्रमुख विलास शिंदे, माजी आमदार वसंत गिते, माजी महापौर विनायक पांडे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस नितीन भोसले, शहराध्यक्ष गजानन शेलार, सचिन मराठे, डी. जी. सूर्यवंशी, माजी महापौर यतीन वाघ, बाळासाहेब वाघ आदी उपस्थित होते.

# नेरळमधील शिवसृष्टीचे काम रखडले

## खा. बारणे यांचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये संताप



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारच्या प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमामधून नेरळ येथील गणेश घाटावर शिवसृष्टी प्रकल्प आणि तेथील ब्रिटिशकालीन धरणाच्या सुशोभिकरण प्रकल्पाचे काम करण्यास सुरुवात झाली. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकल्पाचे काम आजही पूर्ण झाले नाही. दरम्यान, या प्रकल्पासाठी खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून निधी प्राप्त झाला होता; परंतु त्यानंतर झालेल्या दुर्लक्षामुळे हा प्रकल्प अर्धवट राहिला आहे.

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या गणेश घाट आणि तेथील ब्रिटिशकालीन धरण आहे. त्या धरणामध्ये आजूबाजूला शिवसृष्टी उभारणे तसेच पदपथ निर्माण करणे आदी कामे करण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास विभाग महाराष्ट्र शासनाकडून निधी मंजूर झाला होता. त्या निधीमधून कल्याण कर्जत रस्त्यावर शिवसृष्टी विकसित करून नेरळ गावात पर्यटन केंद्र विकसित करण्याचा शासनाचा मानस होता. मात्र, ते काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

## पान १ वरुन



### आता सत्तापरिवर्तन अटळ

शिवानी जंगम, देवन्हावे ग्रा.पं. सदस्य भूषण कडव, आरडीसीसी बँकेचे संचालक प्रदीप लाले, शेकापचे खोपोली शहराध्यक्ष अविनाश तावडे, शेकाप कार्यकर्ते ॲड. रामदास पाटील, खालापूरचे उपगनराध्यक्ष संतोष जंगम, रवी रोकडे, महिला शहराध्यक्ष ज्योत्स्ना रोकडे, कैलास गायकवाड, काँग्रेसचे रिचर्ड जॉन, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष एकनाथ पिंगळे, शरद पवार गट महिला अध्यक्ष खोपोली सुवर्णा मोरे यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. पाटील पुढे म्हणाले की, मुस्लीम समाजाने देशपातळीवर संघटन केले, राज्यपातळीवर संघटन केले, त्यामुळेच आज देशभरात मोदीविरोधी वातावरण निर्माण झाले आहे. मोदींची, भाजपाची हुकूमशाही गाडण्याचे काम आपल्याला करायचे असून, मुस्लीम समाजाने ते काम आधीच हाती घेतले आहे, असेही आ. पाटील म्हणाले. श्रीवर्धन, मुरुडमध्ये, म्हसळ्यामध्ये प्रचारसभेदरम्यान शेकडो मुस्लीम महिलांनी इंडिया आघाडीच्या सभांना उपस्थित राहून आपला पाठिंबा जाहीर केल्याचे आ. पाटील म्हणाले. आदरणीय शरद पवार आज ८४ व्या वर्षीही गावोगावी पायाला भिंगरी लावल्यासारखे फिरत असून, रोज तीन-तीन सभा घेत आहेत, त्यांच्या सभांमुळे जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, विरोधकांनीही धसका घेतला आहे, असे आ. पाटील यांनी सांगितले.

### कंत्राटी परिचारिकांना वेतनाची प्रतीक्षा

यंत्रणेला विचारूनदेखील त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर दिले जात नसल्याचेदेखील बोलले जात आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, ठाणे येथील आरोग्य उपसंचालक कार्यालयामार्फत परिचारिकांची करारावर भरती करण्यात आली आहे. अकरा महिन्यांच्या करारानुसार परिचारिकांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यात सुमारे ५४ बंधपत्रित कंत्राटी परिचारिका कार्यरत आहेत. या परिचारिकांना दर महिन्याला वीस हजार रुपयांचे मानधन दिले जाते. कंत्राटी परिचारिका कायमस्वरूपी परिचारिकांच्या बरोबरीने काम करतात. शासनाच्या वेगवेगळ्या योजना रुग्णांसह रुग्णांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचविण्याचे कामदेखील त्या करतात. लसीकरणाच्या अभियनाबरोबरच वेगवेगळ्या योजनांची जनजागृतीदेखील या परिचारीकांच्या माध्यमातून केली जाते. कायम सेवेत असलेल्या परिचारिकांच्या खांद्याला खांदा लावून बंधपत्रित परिचारिका काम करतात. रात्रीचा दिवस करून आरोग्य सेवा देणाऱ्या परिचारिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, निधी शासनाकडून वेळेवर मिळत नसल्याचा त्रास या परिचारिकांना होत आहे.

### पर्यटकांची गैरसोय

या आलेल्या पर्यटकांना मुरुड नगरपरिषदेतर्फे समुद्रकिनारीच स्वच्छतागृह बांधलेले आहेत. या स्वच्छतागृहाची जबाबदारी खासगी ठेकेदारांना देण्यात आलेली आहे. परंतु, गेल्या दोन दिवसांपासून या स्वच्छतागृहाला टाळे असल्याने येणाऱ्या राज्यभरातून येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे दिसून येत आहे. तरी, नगरपरिषदेने जातीने लक्ष पुरवून सदर बंद असलेल्या स्वच्छतागृहाची सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पर्यटक व नागरिकांतून होत आहे.

### मतदानासाठी भरपगारी रजा

आस्थापना/दुकाने/कंपनी/अशा सर्व आस्थापनांना लागू आहे. ज्या आस्थापनांमध्ये उक्त कामगारांचे अनुपस्थितीमुळे उक्त आस्थापनांचा धोका निर्माण होऊ शकतो अथवा मोठ्या प्रमाणात तोटा होऊ शकतो अशा कर्मचाऱ्यांसाठी लागू नाही. सदर आदेशाचे पालन न करणाऱ्या आस्थापना प्रमुख हे उक्त कलमाचे १३५ ब (२) नुसार कारवाईस पात्र राहतील. सदरहू आदेश हा अन्य जिल्ह्यात काम करणाऱ्या, परंतु जिल्ह्याच्या क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांच्या आस्थापना प्रमुखांनाही लागू होत आहे, असेही आदेशात म्हटले आहे.

### प्रचार तोफा थंडावल्या

पुण्यामधील मावळ, चिंचवड, पिंपरी या तीन अशा एकूण सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. या मतदारसंघात २५ लाख ८५ हजार १८ मतदार आहेत. त्यामध्ये १३ लाख ४९ हजार १८४ पुरुष व १२ लाख ३५ हजार ६६१ महिला मतदार आणि १७३ तृतीय पंथी मतदार आहेत. दोन हजार ५६६ मतदान केंद्रांवर ११ हजार ३६८ कर्मचारी नियुक्त केले आहेत.

### एसटी कर्मचारी पगाराविना

चालक व वाहकांचा समावेश आहे. एसटी महामंडळाला जिल्ह्यातून एका दिवसामध्ये सुमारे ३५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. इंधन बचत करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मानदेखील केला जातो. ईव्हीएम मशीन व कर्मचाऱ्यांची मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्याचे कामदेखील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी केले. एसटीतून त्यांना सुखरुप निश्चित स्थळी सोडण्याची भूमिका प्रामाणिकपणे बजावली.

मात्र, हेच एसटी कर्मचारी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांना मिळणारे वेतन लांबणीवर गेले आहे. वेतन लांबणीवर गेल्याने महिन्यातील घरखर्च चालविताना कर्मचाऱ्यांसमोर आर्थिक अडचण उभी राहिली आहे. दर महिन्याला बँकेतील हप्ता, घरातील सामन खरेदी अशा अनेक बाबींचा ताळमेळ बसविताना समस्या निर्माण झाली आहे.

**निधीअभावी वेतन लांबणीवर**

निधीअभावी कर्मचाऱ्यांचे पगार लांबणीवर गेले आहे. येत्या दोन ते तीन दिवसात पगार होण्याची शक्यता आहे. निधी शासनाकडून पाठविण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. कदाचित सोमवारपर्यंत पगार होण्याची शक्यता आहे, अशी माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून नाव न सांगण्याच्या अटीवरून देण्यात आली आहे.

# मावळमध्ये कोणाचा मुलगा पडला?

**। बीड । प्रतिनिधी ।**


बीड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक रंगात आली आहे. बीडमध्ये भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बजरंग सोनावणे यांच्यामध्ये लढत होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंकजा मुंडे यांच्यासाठीच्या प्रचारसभेत सोनवणे यांना एकप्रकारे दम भरला होता. याला सोनवणे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.सोनवणे यांना आपली मुलगी ग्रामपंचायत-नगरपालिकेसाठी निवडून आणता आली नाही, अन् तरी ते लोकसभेसाठी उभे आहेत. पैसा आला म्हणजे मस्ती आली का? असं अजित पवार म्हणाले होते. यावर सोनवणेंनी प्रत्युत्तर दिलंय की, 'मला मुलगी निवडून आणता आली नाही म्हणता, मग तुम्हाला तुमचा मुलगा मावळमधून का निवडून आणता आला नाही?.'

बजरंग सोनवणे काय म्हणाले? तुम्हालाच राजकारण करता येतं आणि आम्हाला करता येत नाही असं नाही. आम्हीसुद्धा एका भूमिकेने ठरवून सहा महिन्यांसाठी शांत राहिलो. साहेबांनी सांगितलं लोकसभा लढायची म्हणून मी रिंगणात उतरलो. मला म्हणताय मला मुलगी निवडून आणता येत नाही, मावळ लोकसभा निवडणुकीत कोणाचा मुलगा पराभूत झाला दादा? याचं उत्तर आधी तुम्हाला जनतेला द्यावं लागेल. तुम्हालाही तुमचा मुलगा निवडून आणता आला नाही.

ज्यांनी तुम्हाला कानात सांगितलं त्यांना त्यांचे वडील जिल्हा परिषद गटामध्ये निवडून आणता आले नाहीत. आमची मापं काढता, तुमचा माप बीडची जनता काढल्याशिवाय राहणार नाही, असं सोनवणे म्हणाले.

# ‘..तर मराठे त्यांना कचका दाखवतील’

## जरांगे पाटलांचा पुन्हा राज्य सरकारला इशारा



**। जालना । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या धामधूमीत मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेते पुन्हा एकदा आमनेसामने आले आहेत. ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी राज्यात मराठ्यांची संख्या केवळ दहा ते बारा टक्के असल्याची टीका केली होती. यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार उत्तर दिलं आहे. प्रकाश शेंडगेंनी आम्हाला गणिताचे धडे देण्याची गरज नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी शेंडगेंना दिला. त्याचवेळी मला अटक केल्यावर मराठे त्यांना कचका दाखवतील, असा इशाराही राज्य सरकारला दिला आहे.

राज्यात मराठ्यांची संख्या केवळ दहा ते बारा टक्के असल्याची टीका ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी जालन्यातील पत्रकार परिषदेत केली होती. त्यावर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. तुम्ही गोरगरीब धनगर बांधवांसाठी लढलं पाहिजे. तेव्हा आम्ही तुमचं स्वागत करू, आमचं स्वागत करणारे तुम्ही कोण? असं जरांगे यांनी म्हटलं आहे. त्याचबरोबर येवल्याचा जसा चालतो, तसं तुम्ही चालता, असाही टोला मनोज जरांगे यांनी लगावला आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत मी कुणालाही पाठिंबा दिलेला नाही. त्यामुळं ज्यांना वाटतं आमच्यावर अन्याय झाला ते आमच्या बाजूनं बोलतील. अन्याय करूनही अन्याय झाला नसल्याचं ज्यांना वाटतं त्यांचं रक्त चेक करावं लागेल. पण मराठ्यांनी मत वाया न घालवता असं पाडा की त्याच्या पाच पिढ्या उभ्या राहिल्या नाही पाहिजे, असं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे.

# मावळमध्ये चुरशीची लढाई

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघात २०१९ प्रमाणे यावेळी पुन्हा एकदा चुरशीची लढाई होत आहे. मागची निवडणूक जिंकणारे श्रीरंग बारणे यांची यावेळी मात्र कसोटी लागली आहे. दरम्यान, ठाकरे गटाने देखील ही निवडणूक अस्तित्वाची केली असून मावळ प्रांतातील दोन तगड्या उमेदवारांच्यात ही मुख्य लढत होणार आहे.

२००९ मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघ तयार झाला आणि या ठिकाणी सलग तीन निवडणुकीत शिवसेना भाजप युतीने बाजी मारली आहे. श्रीरंग बारणेंना सलग तिसऱ्यांदा शिवसेना पक्षाने उमेदवारी दिली आहे. तर, शिवसेना फुटीच्या पार्श्वभूमीवर मावळमध्ये शिवसेना शिंदे गट विरुद्ध शिवसेना ठाकरे गट अशी लढत होत आहे. तब्बल २६ लाख मतदार असलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात पुणे जिल्ह्यातील तीन आणि रायगड जिल्ह्यातील तीन असे सहा मतदारसंघ येतात. त्या सर्व सहा मतदारसंघात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्षाचे आमदार आहेत. पण राज्यातील राजकीय समीकरणे आणि मतांचे ध्रुविकरण लक्षात घेता

- **वाघेरेंसाठी पोशक वातावरण**
- **इंडिया आघाडीकडून मोर्चेबांधणी**

मावळमध्ये यावेळी चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे.

शिवसेना फुटीनंतर उद्धव ठाकरे यांना जनमानसात मिळत असलेली सहानभुती तसेच इंडिया आघाडीची या मतदारसंघात निर्माण झालेली मोट यामुळे संजोग वाघेरे-पाटील यांनी या लढतीत उत्सुकता निर्माण केली आहे. इंडिया आघाडीकडे मुस्लिम समाजाची मते वळली असल्याचे दिसून येत आहे. त्याचवेळी मराठा आरक्षण मिळवून देण्यासाठी विद्यमान खासदारांचे सहकार्य मिळाले नसल्याची भावना मराठा समाजाची आहे. त्यामुळे मराठा समाज या मतदारसंघात इंडीया आघाडीच्या पाठीशी उभे राहील्याचे चित्र आहे. या सर्व बाबिंशिवाय शरद पवार यांची राष्ट्रवादी, तसेच राष्ट्रीय काँग्रेस हे एकदिलाने इंडिया आघाडीसाठी आपली



सर्व शक्ती लावून प्रचारात उतरले आहेत. त्यावेळी सर्वात महत्वाची भूमिका या मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष बजावताना दिसत आहे. शेकापचे सर्व कार्यकर्ते इंडिया आघाडीसाठी मैदानात उतरले असल्याने पनवेल, खालापूर, उरण आणि कर्जत तालुक्यात संजोग वाघेरे यांच्या मागे ताकद लावून आहेत. तर, दुसरीकडे महायुतीमध्ये सर्व घटकपक्ष एकत्र प्रचार करताना दिसत नाहीत. त्याचा फटका बारणेंना या निवडणुकीत बसण्याची शक्यता आहे.

रायगड जिल्ह्यातील तिन्ही मतदारसंघात महायुतीचे आमदार आहेत. मात्र, त्यात उरणमध्ये भाजप आमदारांच्या मतदारसंघात इंडिया आघाडीने जोरदार लढत देण्याची तयारी दाखवली आहे. त्यामुळे उरणमध्ये महायुती आघाडी मिळविण्याची शक्यता कमी आहे. कर्जतमध्ये महायुतीच्या घटक पक्षांची ताकद पाहिली तर इंडिया आघाडी पेक्षा किमान ६० हजारांचे मताधिक्य मिळण्याची शक्यता आहे. परंतु, स्थानिक पातळीवर एवढे मताधिक्य बारणे यांना मिळेलच याचा ठाम दावा कोणीही करताना दिसत नाही.

पनवेल मतदारसंघात भाजपची ताकद प्रंचड आहे. पण, तेथे शेकापने मोठी ताकद उभी केली आहे. ही ताकद संजोग वाघेरे यांच्यामागे उभी असून पनवेल मधील बारणेंचे मताधिक्य घटण्याची शक्यता वाढली आहे. मावळ मतदारसंघातील दोन्ही उमेदवार हे पिंपरी चिंचवड भागातील असल्याने आणि त्या दोन्ही उमेदवारांची ताकद लक्षात घेता त्या भागातून आघाडी घेउन येणारा उमेदवार मावळचा खासदार बनणार आहे.

दरम्यान, मावळमध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून हा मतदारसंघ पुन्हा मिळविला जातो काय? किंवा बारणे हे तिसऱ्यांदा खासदार होतात काय? हे पाहणे महत्त्वाचे आहे. मात्र, शिवसेना ठाकरे गटाने ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने आणि इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांना मिळणारा प्रतिसाद पाहता काही अनपेक्षित निकाल देखील लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या मतदारसंघात अन्य ३१ उमेदवारांकडून निवडणूक लढवली जात आहे. त्यातील बहुजन समाज पार्टी, वंचित बहुजन आघाडी या उमेदवारांकडून किती मते घेतली जातात यावर देखील विद्यमान खासदारांच्या मतांचे गणित अवलंबून राहणार आहे.

## कडेकोट पहारा असताना पैसा पोहोचला कसा?


### पंडित पाटील यांचा प्रशासनाच्या कारभारावर संशय

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा निवडणूक प्रक्रीयेच्या काळात गैरप्रकार टाळण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथक तैनात करण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र कामात चोखपणा दिसला नसल्याचा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे. जिल्ह्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कडेकोट पहारा, नाक्यानाक्यावर बंदोबस्त असताना गावात पैसा पोहचला कसा, असा सवाल पंडित पाटील यांनी व्यक्त करीत प्रशासनाच्या कारभारावर संशय व्यक्त केला आहे. याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.



रायगड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थिर सर्वेक्षण पथक तयार करण्यात




आले होते. जिल्ह्यातील अनेक भागात, कार्यक्रमाच्या ठिकाणी हे पथक येऊन पाहणी करीत होते. महामार्गासह नाक्यानाक्यावर स्थिर सर्वेक्षण पथक तैनात केले होते. या पथकामार्फत येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. मात्र, ही यंत्रणा पुर्णतः फेल ठरल्याचा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केली. सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली यंत्रणा काम करीत असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. निवडणुकीच्या काळात गावागावांमध्ये पाचशे रुपये प्रमाणे मतदारांपर्यंत पैशाचे बंडल पाठविण्यात आले. मात्र, त्याबाबत ही यंत्रणा अपयशी का ठरली, हा पैसा कसा पोहचला, असा संशय पाटील यांनी व्यक्त करीत प्रशासनाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली.

## वेधक

## दिघोडे-दास्तानफाटा उड्डाण पुलावर अवजड वाहनांना बंदी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदार संघ अंतर्गत उरण, पनवेल व खालापूर तालुक्यातील एकूण ३४४ मतदान केंद्रावर १३ मे रोजी मतदान होणार असल्याने १२ मे रोजी मतदान अधिकारी व कर्मचारी यांना जासई येथील विधानसभा निवडणूक कार्यालयातून निवडणूक साहित्य वितरण करण्यात येणार आहे. त्यामुळे १२ मे सकाळी ६ ते दुपारी २ आणि १३ मे रोजी सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत उरण तालुक्यातील दिघोडे ते दास्तानफाटा उड्डाणपुलावरून जाण्यासाठी अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. यामध्ये वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही इतर जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने तसेच पोलिस वाहने, फायर ब्रिगेट, रुग्णवाहिका, निवडणुकीची वाहने व इतर अत्यावश्यक वाहनांना लागू होणार नाही.



तसेच, दिघोडे येथून दास्तान मार्गाकडे जाणारी अवजड वाहने पर्यायी जांभूळपाडा, वागधोंडी, गव्हाणफाटा जंगलकट मार्गे इच्छित स्थळी जाण्यासाठी ठेवण्यात आल्याचे आदेश नवीमुंबई वाहतूक पोलिस विभागाचे पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दिले असून, तशा प्रकारे अवजड वाहन चालकांनी आदेशाची अंमलबजावणी करावी, असे आवाहन उरण वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलंडे यांनी केले आहे.

## गाड्या तपासणीचे काम सुरुच

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत अलिबाग विधानसभा मतदारसंघात ७ मे रोजी शांततेत निवडणूका संपन्न झाल्या. तरी देखील निवडणूक आयोगाने भरारी पथक व स्थिर पथक कार्यरत ठेवल्याने शिघ्रे चेक पोस्ट जवळ येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांची तपासणीचे काम सुरूच आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कुठेही आचारसंहिता भंग होवु नये तसेच, निवडणुक शांततेत व सुरळीत व्हावी या दुष्टीने भारत निवडणुक आयोगाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी रायगड अलिबाग व सहा. निवडणुक निर्णय अधिकारी अलिबाग यांनी भरारी पथक, आचारसंहिता पथक, स्थिर सर्वेक्षण व व्हिडिओ सर्वेक्षण पथकांची नेमणुक केली होती. निवडणुका संपल्या तरी भरारी पथक व स्थिर पथके कायम ठेवण्यात आले असून गाड्याची तपासणी सुरूच आहे.



## कर्जतमध्ये निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात १३ मे रोजी होणाऱ्या मतदानाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. निवडणुकीच्या तयारीची अंतिम पाहणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व प्रांत अधिकारी अजित नैराळे यांनी केली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ५ हजार मतदार आहेत. त्यात एक लाख ५३ हजार मतदार हे पुरुष तर एक लाख ५१ हजार महिला मतदार आहेत. मतदारसंघात संपूर्ण कर्जत तालुका आणि खालापूर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गट तसेच, खोपोली नगरपरिषद आणि खालापूर नगरपंचायतीचा समावेश आहे.

या निवडणुकीसाठी ३३९ मतदार केंद्र असून मूळ मतदार केंद्रांची संख्या ही ३३५ आहे. तर, १२००पेक्षा जास्त मतदार असलेल्या मतदान केंद्रांवर सर्व मतदारांना वेळेत मतदान करता यावे यासाठी चार मतदान केंद्र वाढविण्यात आली आहेत. त्यात कर्जत तालुक्यात दोन ठिकाणी दुर्गम मतदान केंद्र असून तुंगी आणि ढाक या ठिकाणी ही केंद्र असणार आहेत. तर, कळकराई आणि पेठ येथील मतदान केंद्र येथील मतदारांच्या परवानगीने दुर्गम भागातून खाली पायथ्याशी आणली आहेत. निवडणुकीसाठी आवश्यक असलेल्या अधिकारी कर्मचारी यांचे निवडणूक प्रशिक्षण हे कर्जत जवळील शेळके मंगल कार्यालयात पार पडले.



**तगडा पोलीस बंदोबस्त...**

या निवडणुकीसाठी मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यात कर्जत तालुक्यात असलेल्या २३५ मतदान केंद्रांसाठी वेगवेगळ्या प्रकारचा पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील मतदान केंद्रासाठी १२१ पोलीस तसेच ११३ होमगार्डांच्या मदतीला बीएसएफ जवानांच्या एका तुकडीचा बंदोबस्त असणार आहे. तर, नेरळ पोलीस ठाणे हद्दीमधील मतदान केंद्र तसेच अनुचित प्रकार घडू नये यासाठी ८३ पोलीस कर्मचारी ८६ होमगार्ड आणि बीएसएफ जवानांची एक तुकडी तैनात असणार आहे.

## ‘वोट भी दो, नोट भी दो’

### राजाराम पाटलांचा अजब नारा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघात बहुजन समाज पार्टीचे राजाराम पाटील निवडणूकीच्या रिंगणात आहेत. २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने त्यांना उमेदवारी दिली होती. ७६ हजार मते मिळवून पाटील तिसऱ्या स्थानावर होते. या निवडणुकीत मात्र वंचितची साथ सोडून ‘वोट भी दो, नोट भी दो’चा नारा देत देशासमोर असलेला बसपाचा तिसरा पर्याय मतदारांनी निवडावा, असे आवाहन राजाराम पाटील यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे.



वंचित बहुजन आघाडीने आरक्षणाच्या मुद्द्यावर मराठा समाजाला समर्थन देण्याची भूमिका घेतली. त्यामुळे वंचितची भुमिका पटली नसल्याने राजाराम पाटील यांनी बहुजन समाज पार्टीचा पर्याय निवडला आहे. बसपानेही मावळ लोकसभेची उमेदवारी देऊन निवडणुकीच्या आखाड्यात उतरवले आहे. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्याच्या कामाची आणि मागील लोकसभा निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकाची मते याची दखल घेऊनच बहुजन समाज पार्टीने राजाराम पाटील यांना उमेदवारी दिली आहे. ओबीसी, एससी, एसटी समाजातील लोकांच्या न्याय हक्कासाठी बसपाच्या माध्यमातून निवडणूक लढवित आहोत. सिडको, जेएनपीए, एमआयडीसी प्रकल्पग्रस्तांच्या कवडीमोल भावाने जमिनी घेऊन मोठ्या भावाने विक्री करीत शेतकऱ्यांची फसवणूक केला असल्याचा आरोपही राजाराम पाटील यांनी यावेळी केला आहे.

## गोमातासाठी सदैव तत्पर

**रसायनी :** विश्व हिंदु परिषद आणि बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने साकारलेले रसायनी पाताळगंगा येथील बजरंगी मित्र मंडळाचे गोमाता संरक्षक मलेश गुडसे यांच्या सहकार्यातून बजरंगी बांधव परिसरातील गोमातांच्या आरोग्याची काळजी घेताना दिसत आहेत. परिसरातील गोमांताना कोणतीही इजा झाल्यास हे बजरंगी बांधव एकत्रित येतात आणि पशुवैद्यकिय डॉक्टरांशी संपर्क करुन गोमातेचे संरक्षण करत असतात. रसायनी परिसरातील काही गाईंची नखे व शींगे वाढली आहेत, त्यांना चालताना खुप त्रास होतो, अशी माहिती बजरंगी बांधवांजवळ अनेकांनी बोलून दाखविली. त्या गोमातेची पशुधन विकास अधिकारी व बजरंग दल सदस्यांनी शनिवारी दुपारी मोहोपाडा मैदानाजवळ अडवून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत कोकरे, दिनानाथ पाटील, जनार्दन मालुसरे यांच्या सहकार्यांने गोमातांच्या पायाची वाढलेली नखे काढण्यात आली.




**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा २०२४ निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलिसांनी ग्रामीण भागात रुट मार्च काढून निवडणूक शांततेत पार पाडण्याचे आवाहन केले.

वपोनि अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे येथील १ आरपीएफ जवानांची कंपनी प्राप्त झाली होती. या कंपनीचे २ अधिकारी, २२ अंमलदार, झोन २ स्ट्रायकिंगवरील १ अधिकारी ११ अंमलदार यांचा समावेश होता. त्यांच्यासह पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांच्यासह २ सपोनि/पोउनिरी व १७ पोलीस अंमलदार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील रिटघर, दूंदरे, नेरे या गावामधील मतदान केंद्रे व बूथ तसेच गर्दीच्या ठिकाण येथे भेट देउन निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून गावामध्ये पायी रूट मार्च करण्यात आला. तसेच, निवडणुकीत शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले.

## युरीया खताची मागणी

**तळा :** यावर्षी भरपूर पाऊस होण्याचा अंदाज असल्याने तालुक्यात मोठ्या प्रमाणावर खरीप पिकांची पेरणी व लागवड होणार आहे. त्यामुळे खरीप पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर युरिया खताच्या मागणीत वाढ होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे युरियाचा पुरवठा तातडीने व्हावा, अशी मागणी तळा तालुका शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. तळा तालुका शेतकरी संघटनेचे सचिव कैलास पायगुडे यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांची भेट घेतली. तालुक्यासाठी मे महिना अखेर युरियाचा पुरवठा होणे आवश्यक असून याबाबतीत किती टन युरिया लागणार आहे त्याचे नियोजन तातडीने करावे, याबाबतीत चर्चा करण्यात आली.

## नवी मुंबई पोलिसांची धडक कारवाई

### २ कोटी ९ लाखांची रोकड जप्त

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नियुक्त करण्यात आलेल्या फिरते निगराणी पथक व स्थिर देखरेख पथकाने गत दिड महिन्यामध्ये बेकायदेशीररीत्या वाहनातून नेली जाणारी तब्बल २ कोटी ९ लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. त्याशिवाय नवी मुंबई पोलिसांनी अंमली पदार्थाची तस्करी करणारे, बेकायदा मद्य बाळगणारे व विकणारे, तसेच बेकायदा शस्त्र बाळगणारे व विक्री करणाऱ्यांवर देखील धडक कारवाई केली आहे.

मुंबई, ठाण्यात पाचव्या टप्प्यासाठी २० मे रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या कालावधीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नवी मुंबई पोलिसांकडुन प्रयत्न करण्यात येत आहेत. निवडणुक आयोगाकडुन लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये, तसेच आचारसंहीतेचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी नवी मुंबई पोलिसांकडुन विशेष खबरदारी घेतली जात आहे. त्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १२ फिरते निगराणी पथक (एफएसटी) तसेच १४ स्थिर देखरेख पथक (एसएसटी) नियुक्त करण्यात आले आहेत.

या पथकाच्या माध्यमातुन बेकायदा नेली जाणारी मोठी रोकड, अंमली पदार्थ, अवैध मद्यसाठा आणि मद्याची वाहतूक करणाऱ्यावर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. या पथकाने गत १६ मार्च ते ७ मे या कालावधीत स्थिर देखरेख पथकाने ६ कारवायांमध्ये तब्बल २ कोटी ९ लाख १० हजाराची रक्कम पकडली आहे. यात नुकतीच ऐरोली येथे रिक्षातून नेली जाणारी तब्बल १ कोटी ६० लाखाची रोकड पकडलेल्या रक्कमेचा देखील समावेश आहे.

नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथक व पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थाची तस्करी व सेवन करणार्यांविरोधात देखील मोठी कारवाई केली असून आचारसंहीता लागू झाल्यापासून पोलिसांनी आतापर्यंत अमली पदार्थ तस्करीच्या २८ कारवाया केल्या आहेत.

## आपच्या कल्पक प्रचाराची सर्वत्र चर्चा

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

मावळ मतदारसघांत इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांना निवडून आणण्यासाठी सर्वच पक्षीय नेते व कार्यकर्ते जीवाचे रान करीत आहेत. गावागावात सभा, बैठकांनी जोर पकडला आहे. शिवसेना (उबाठा), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी हे जोमाने प्रचार करीत आहेत.



आपल्या नवनवीन आयडियांसाठी प्रसिद्ध असणारे आम आदमी पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ.शेखर अलका तुळशीदास जांभळे यांनी उत्साही व कल्पक घोषणांनी केलेला मशाल निशाणीचा प्रचार सर्वत्र व्हायरल होत आहे. खुद्द उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांनी सुद्धा या प्रचारासाठी डॉ.शेखर जांभळे यांचे कौतुक केलेले आहे.

काकाला सांगा, मामाला सांगा, दैनंदिन व्यवहारात असणाऱ्या नातीगोती, आडनावे, व्यक्ती यांच्या माध्यमातून होत असलेला प्रचार हा सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या उर्जादायी घोषणांनी प्रचारात उत्साह निर्माण होत आहे. फेसबुक, इंस्टाग्राम या माध्यमांवर देखील कौतुकाचे सुर उमटत आहेत. मराठी व हिंदीत असणाऱ्या घोषणांनी मावळ मतदारसंघात मशाल निशाणीच्या प्रचारात जोर पकडला आहे.

## रद्द झालेले थांबे पुन्हा कधी सुरु होणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वे लाईनवरील कर्जत रेल्वे स्थानकात पूर्वी असलेले थांबे कोवीडमध्ये रद्द करण्यात आले. ते थांबे पुन्हा सुरू करण्याचे काम लोकप्रतिनिधी आणि प्रवासी संघटना करणार आहेत की नाही, असा प्रश्न सर्वसामान्य प्रवासी विचारत आहेत. तर लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्या पुन्हा सुरू करण्यासाठी लोकप्रतिनिधी स्वारस्य दाखवणार आहेत का, असा प्रश्न प्रवासी करत आहेत. दरम्यान, खासदार बारणे यांच्याकडून त्या बंद गाड्या सुरू करण्यासाठी आणि रद्द केलेले थांबे पुन्हा सुरू करण्यासाठी कोणतीही




कार्यवाही झाली नसल्याने प्रवासी व स्थानीक नाराज आहेत.

कर्जत हे रेल्वे स्थानक पुणे घाट माथ्यावर जाण्यापूर्वीचे महत्वाचे स्थानक आहे. पुण्याकडे जाणाऱ्या प्रत्येक गाडीला मागे डबल इंजिन लावण्याची गरज असते आणि कर्जत ते लोणावळा या भागात अशी बँकर काम करीत असतात. त्या कर्जत स्थानकात पुणे भागांतून येणाऱ्या बहुसंख्य गाड्यांना प्रवासी थांबे होते. तर कर्जत येथे मुंबईकडून येणाऱ्या गाड्यांना कर्जत हा अधिकृत थांबा होता. मात्र, रेल्वे प्रशासनाने कोविड काळात प्रवासी संख्या रोडावली असल्याने प्रवासी थांबे कमी केले होते. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत होते आणि प्रवाशांना पुणे येथून कर्जतकडे येताना एकतर लोणावळा येथे उतरावे लागत होते किंवा कल्याण येथे उतरून पुन्हा कर्जत भागात यावे लागत आहे. ही परिस्थिती कोवीड संपून दोन वर्षे लोटल्यानंतर देखील कायम आहे. पूर्वी कर्जत येथे थांबा असलेल्या गाड्या कर्जत येथे पुन्हा थांबाव्यात यासाठी स्थानिक प्रवासी संघटनेकडून या भागातील लोकप्रतिनिधीकडे सातत्याने मागणी केली गेली. मात्र, खासदार बारणे हे बंद केलेले थांबे पुन्हा सुरू करू शकले नाहीत. रेल्वे राज्यमंत्रींकडे देखील कर्जत येथील भाजप कार्यकर्ते पदाधिकारी यांनी धाव घेतली. मात्र, त्यावेळी रावसाहेब दानवे यांनी आश्वासन देउन देखील बंद केलेले प्रवासी थांबे तसेच बंद झालेल्या गाड्या देखील पुन्हा सुरू झालेल्या नाहीत.

ही परिस्थिती सुधारण्यासाठी विद्यमान खासदारांकडून कोणत्याही उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे आरोप प्रवासी व स्थानीक नागरीक करीत आहेत.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ मे

१) श्री.नबाबशाह फट्टूशाह फकीर मु.राऊतवाडी, अलिबाग, १२-५-१९५५

२)श्री.विनोद गजानन दळवी पंतनगर, चेंढरे-अलिबाग १२-५-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-**
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



**मा. आमदार श्री. महेंद्र शेट दळवी, वाढदिवसानिमित्त, अलिबाग**

# चार गाड्यांचा अपघात

**। कोर्लई । वार्ताहर।**

शनिवारी (दि.११) सायंकाळी ४:३० वाजताच्या सुमारास मुरूड-मुंबई मार्गावर विहूर गावाजवळ असलेल्या एका लॉजच्या बाहेर चार कार उभ्याहोत्या. त्याचवेळीमुरूडचा जंजिरा किल्ला पाहून मुंबईच्या दिशेने जात असताना पुण्याचे पर्यटक आपल्याजवळील व्यागनर गाडीने समोर उभ्या असणाऱ्या गाड्यांना जोरदार धडक दिली. त्यामुळे या तिन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले. व चौथ्या गाडीला किरकोळ नुकसान झाले आहे. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. तसेच, सर्वच पर्यटक सुखरूप असल्याचे दिसून आले.



# मुरुड समुद्रकिनारा हाऊसफुल्ल



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड हे पर्यटनाचे क्षेत्र असल्याने पर्यटकांचे पाऊले आपोआप मुरुड समुद्रकिनारी वळत असतात. शनिवारी शेकडोंच्या संख्येने विविध जिल्ह्यातुन पर्यटक मुरुड समुद्रकिनारी दाखल झाले असुन पर्यटकांनी मनोसक्त समुद्रात पोहण्याचा तर काहीजणांनी घोडागाडीतुन फिरण्याचा आनंद लुटताना दिसले. यामुळे मुरूड समुद्रकिनारा हाऊसफुल्ल झाल्याचे दिसून आले. गेले काही दिवस पर्यटकांनी मुरूडकडे पाठ फिरवली होती. परंतु, शनिवारी आलेल्या पर्यटकांमुळे येथील लॉजींग, हॉटेल्स व टपरीधारकांचा व्यवसाय तेजीत आल्याचे दिसुन आले. तसेच पर्यटकांच्या गर्दीने व्यवसायीकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसुन येत आहे.

# अपघातात दुचाकीस्वार जखमी

**। माणगाव । वार्ताहर।**

माणगाव इंदापूर येथील मुंबई-गोवा महामार्गावर शनिवारी (दि.११) पहाटे साडेतीनचा सुमारास पिकअप व दुचाकीत समोरासमोर धडक लागून अपघात घडला. या अपघातात दुचाकीस्वार जखमी होउन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या अपघातात दुचाकीस्वार सचिन विजय बद्रिके (३५) रा. भांडूप हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्या दाखल करण्यात आली आहे. या अपघाताचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हावलदार दोडकुलकर हे करीत आहेत.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक संगिता सुरेंद्र व्यापारी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-जांभरुंग, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १२२/६/अ | ०-९६-०० हे आर पॉ | ०-५३ |
| १२२/६/ब | १-२०-०० हे आर पॉ | ०-५३ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १२/०५/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दुर्वास आत्माराम पाटील यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरूड | २६०/१ | जिरायत ०-४८-८०<br>वरकस ० ६७-००<br>पो.ख. ०-२६-००<br>एकूण क्षेत्र १-४१-८० | ८.८९ |

वर नमूद मिळकतीमधील श्री. दुर्वास आत्मराम पाटील यांच्या मालकीचे क्षेत्र ०-३४-०० हे.आर., पो. ख. ०-२६-०० हे. आर., एकूण क्षेत्र ०-६०-०० हे. आर. आकार २.६१ रू.पै.

दिनांक :- १२/०५/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ताः फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे मुगपे, ता-कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक अनिकेत रविंद्र पाटील व इतर यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकत

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|---|
| ५९ | ० | ०.४१.७० | २.३७ |
| ६० | ६ | ०.७९.०० | ०.६६ |
| ६० | ८ | ०.०४.०० | ०.०३ |
| ६० | १० | एकुण क्षेत्र ०.६९.००<br>त्यापैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र-०.४०.०० | ०.६६ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक अनिकेत रविंद्र पाटील व इतर यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासुन १५ दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह हरकत दाखल करावी, वरील देण्यात आलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस सदरील मिळकतीचे मालक व आमचे आशिल हे जबाबदार राहणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

दिनांक १२/०५/२०२४

**ॲड समीर हरीश्चंद्र लाड**
(बी ए.एल.एल.बी)
पत्ता दिवाणी कोर्टासमोर साई सावली
आपार्टमेन्ट गाळा नंबर ०२ - कर्जत
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रंमाक ९९२१७२२२००

## जाहीर नोटीस

आमचे तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) मंगेश धर्माजी पाटील, व (२) मानसी मंगेश पाटील (पूर्वाश्रमीची ललीता सदानंद दिवकर) यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील मौजे चेंढरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं. २७/अ/६, ४५/१/क/२ या बिनशेती मिळकतींवर बांधण्यात आलेल्या 'ज्वेल्स ऑफ अलिबाग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत' या संकुलामधील 'जे' इमारतीमधील पहील्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. जे-०६, बिल्टअप क्षेत्रफळ ७६० चौरस फुट (७०.६ चौमी) ज्यासी ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. १७७७/६

सदरहू वर्णन केलली निवासी सदनिका मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर निवासी सदनिका मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर निवासी सदनिका मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबेकब्जा वहीवाट रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ११/०५/२०२४

सही /-
**ॲड. अनिकेत हनुमंत गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी महाराज चौक, अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. ९८५०४०२०५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक श्री. काळुराम रतन पाटेकर आणि श्री. संदिप जगन्नाथ लोंगले यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ(हे.आर.पॉ.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| ४१/२/अ | ०.६०.०० हे. आर. पॉ.<br>यापैकी लिहून देणार यांचे दिलेले क्षेत्र ०.२०.०० हे. आर. पॉ. | ०.३७ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आम्ही सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करू व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आम्हावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १२/०५/२०२४

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६

सही/-
**ॲड. नरेश मारूती बैलमारे**
मो. ९८२३९७८७८५
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड-४१० २०१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिका असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक ज्योती विजय जोशी रा. बी विंग ४०४ पद्मावती दर्शन नाम जोशी मार्ग लोअर परेल मुंबई ४०००१३ यांच्याकडून सदरची निवासी सदनिका कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून सदर निवासी सदनिका ही मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे गोंधळपाडा येथील ग्रामपंचायत वेश्वी हद्दीतील तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं.३० क्षेत्र ०-३६-४० हे आर या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेली राजहंस रिजटलस को. ऑप. हौसिंग सोसायटी मधील डॅफोडाईल्स उंचावलेला तळ मजला, सी विंग मधील निवासी सदनिका क्रमांक १०१ सेलेबल क्षेत्र ८५० चौरस फूट बिल्टअप कार्पेट ५९५ चौरस फूट (त्याचा ग्रामपंचायत वेश्वी मालमत्ता क्र.८३७ सी १०१ असा आहे) अशी सर्व मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर निवासी सदनिका मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, ह्वाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख ११/०५/२०२४

सही /-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
पत्ता- शॉप नं. ४, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग येथील :-**

| विद्यमान मालकाचे नाव | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री अशिष अंकूश वार्डे | ३० | ०-३७-२० | ८-६२ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ११/०५/२०२४

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल सौ. कांचन विनय म्हात्रे, रा. जे एन २-४३ ए-७ जय महाराष्ट्र सोसायटी, मिनी मार्केट जवळ, सेक्टर ९, नवी मुंबई, वाशी, ठाणे, ४००७०३, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे टेंभरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स. नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ६५/२ | १.०८.०० | ३.०६ | श्री. रमेश नारायण पिंगळे, वैगेरे |
| यापैकी श्री. आदिल अस्लम पटेल यांच्या हिश्श्याचे ०.४०.०० हे. आर. पॉ. क्षेत्र. | | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १२/०५/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नंदकुमार रामभाऊ उर्फ रामचंद्र नाईक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरूड | २६०/१ | जिरायत ०-४८-८०<br>वरकस ०-६७-००<br>पो.ख. ०-२६-००<br>एकूण क्षेत्र १-४१-८० | ८.८९ |

वर नमूद मिळकतीमधील श्री. नंदकुमार रामभाऊ उर्फ रामचंद्र नाईक यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२०-०० हे. आर., आकार १.५४ रू.पै.

दिनांक :- १२/०५/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड्स

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- 175 sq.ft दुकान गाळा, भाड्याने देणे आहे बे-वूड्स कॉम्प्लेक्स, गोंधळपाडा, अलिबाग ८८०५०२२३२०/८८०६३३१०००
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- Accountant पाहिजे २-३ वर्षांचा अनुभव पगार- २०,०००/- महिना ठिकाण-बामणसुरे, चोंढी contact-9823585321
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १. वेटर २. रिसेप्शन ३. हॉटेल मॅनेजर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/ नापास ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३.
- विद्यानगर, चेंढरे येथे 2BHK टेरस फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र- १२०० Sqft. संपर्क : PROLOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३
- अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी १५०००, २००००, २५००० + सुपर इनसेंटीव तसेच अलिबागमधील विविध शाखांसाठी होम रिव्हाईज एज्युकेशन प्रा.लि. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counsellors /sales executive-20, Team managers- 5, Telcaller- 3, संपर्क- ८४१९९४०००४/९३७२०७१७६९
- 'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे महिला व पुरुष सफाई कामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण-इंद्रप्रस्थ, गांवदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क - ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ८४२१३५४६४०
- सकाळी घरकामासाठी बाई हवी आहे. ८ ते १० पर्यंत (अलिबाग परिसरातील राहणाऱ्याला प्राधान्य.) संपर्क : ९२८४५५५३१४
- Fresh graduates required for office work. For interview call. ९९२३७५०५४९

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रमाकांत तुकाराम खांडेकर यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी- विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बामणोली ता. अलिबाग | ३२ | जिरायत ०-५२-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-५२-०० | २.८९ |

दिनांक :- १२/०५/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतींचे विद्यमान मालक रामचंद्र निळकंठ होनगाडू, प्रिता प्रविण किल्लेकर भारती सुरेश साष्टे, सुविधा श्रीधर होनगाडू, मंदार श्रीधर होनगाडू यांचेकडुन खरेदी घेण्याचा करार केला आहे. सदर मिळकतीमधील मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| किहीम ता.अलिबाग, जिल्हा रायगड | २६५ | ०-१२-९० | १.१० |
| किहीम ता. अलिबाग, जिल्हा रायगड | २७८ | १-१८-६० | ८.१२ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-११/०५/२०२४

**ॲड. रविंद्र वि.ओक**
''गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,मु.पो.ता. अलिबाग, जि.रायगड.

# विक्रेत्या महिलांचा रस्त्यावर ठिय्या

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**श्रीवर्धन नगरपरिषदेने गावठी भाजी विक्री करणाऱ्या महिलांसाठी दादर पुलावरती प्रशस्त असे मार्केट बांधून दिलेले आहे. परंतु, गावठी भाजी व फळे विक्री करणाऱ्या महिला या सदर मार्केटमध्ये बसत नसून रस्त्यावर बसत आहे. त्यामुळे श्रीवर्धन बाजारपेठेत अगोदरच अरुंद असलेल्या रस्त्यांवरती मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी वारंवार होत असते. ओले काजूगर, करवंदे, कैरी, आंबा इत्यादी विक्री करणाऱ्या महिला आता नव्याने त्या ठिकाणी बसत असल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालणेदेखील मुश्किल होऊन बसले आहे.**


बाजारपेठेत प्रचंड वाहतूक कोंडी

नगरपरिषदेने बांधलेल्या मार्केटमध्ये नेहमीच शुकशुकाट पाहायला मिळतो. त्या ठिकाणी कोणत्याही भाजीविक्रेत्या महिला भाजी विक्री करण्यासाठी बसलेल्या पाहायला मिळत नाहीत. सदर भाजी विक्री करणाऱ्या महिलांचा एकच समज आहे की, आम्ही जेवढे रस्त्यावर पुढे बसू, तेवढ्या प्रमाणात आमची भाजी जास्त संपेल. परंतु या महिला रस्त्यावर बसल्यामुळे श्रीवर्धनमधील सामान्य नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो. श्रीवर्धन शहरात वाहतुकीचे नियमन करण्यासाठी केवळ एकच वाहतूक पोलीस तैनात आहे. सदरचा वाहतूक पोलीस हा श्रीवर्धन शहराच्या प्रवेशद्वारावर किंवा शिवाजी चौक या ठिकाणीच उभा असतो.

प्रत्यक्षात ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते, त्या ठिकाणी कोणीही पोलीस हजर असलेला पाहायला मिळत नाही. जर श्रीवर्धन शहरात एकच वाहतूक पोलीस तैनात आहे, तर स्थानिक पोलीस ठाण्याने एखाद होमगार्ड किंवा कॉन्स्टेबल यांची नेमणूक बाजारात वाहतुकीच्या नियमनासाठी करण्याची गरज आहे. सदर रस्त्यावरती बसणाऱ्या महिलांवर नगरपरिषदेकडूनदेखील कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. नगरपरिषदेचे अधिकारीच कधी बाजारपेठेत फिरताना आढळून येत नाहीत.

भाजी विक्रेत्या महिलांसोबतच श्रीवर्धन शहरातील मुख्य प्रश्न आहे तो रस्त्याच्या दुतर्फा वेड्यावाकड्या उभ्या केल्या जाणाऱ्या दुचाकी. सदर दुचाकी स्वारांवरती दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. वेड्यावाकड्या दुचाकी उभे करून अनेक जण बाजारात खरेदीसाठी किंवा सलूनमध्ये दाढी करण्यासाठी बसून जातात. वाहन चालक मात्र हॉर्न वाजवून वाजवून शेवटी गाडीतून उतरून सदर दुचाकी स्वतः बाजूला करून रस्ता मोकळा करून घेतात. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने रस्त्यावर भाजी विकणाऱ्या महिलांवरती कारवाई करण्याची आवश्यकता आहे. तसेच पोलिसांनीदेखील दुचाकीस्वारांवर कारवाई करण्याची गरज आहे.

## पत्नीवर जीवघेणा हल्ला

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील नेरळ उमानगर भागातील जंगल भागात पत्नीला नेऊन तू आपल्या गावी चल असे सांगता तिने नवऱ्याच्या घरी गावी जाण्यास नकार दिला. त्यामुळे संतापलेल्या नवऱ्याने पत्नीवर लोखंडी हत्याराने हल्ला करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. दिव्या मोहन खुंजूर या आपल्या आईकडे नेरळ येथील उमानगर भागात राहायला आल्या होत्या. त्यांचे पती हे नऊ मे रोजी तेथे आले आणि त्यांनी पत्नी दिव्या यांना महत्त्वाचे बोलायचे आहे असे सांगून बाहेर नेले. येथील स्मशानभूमीजवळील जंगलात जाऊन अजयने पती दिव्याला आपल्या गावी जा अशी सूचना केली. मात्र, दिव्या यांनी गावी जाण्यास नकार दिल्याने संतापलेल्या पती अजयने पत्नी दिव्यावर लोखंडी रॉडच्या सहाय्याने हल्ला केला. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोसई श्री. मांडलिक करीत आहेत.

# महावितरणचा अनागोंदी कारभार

## रात्री-अपरात्री वीजपुरवठा होतोय खंडित

**। हमरापूर । वार्ताहर ।**

पेण शहरासह तालुक्यात परिसरात महावितरणच्या गलथान कारभारामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होऊ लागला असून, या परिसरातील वीज ग्राहकांना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मात्र, याची गांभीर्याने दखल घेतली जात नाही. त्यामुळे येथील जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शहरात व आजूबाजूच्या अनेक गावांमध्ये गेल्या काही दिवसापासून वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार घडू लागला आहे. या समस्येमुळे येथील लघुउद्योगांवर परिणाम होऊ लागला असून, वीज ग्राहकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. विजेचा लपंडाव सुरू असूनदेखील महावितरणतर्फे वीज ग्राहकांना अवाढव्य रकमेची बिले मात्र वेळच्या वेळी पाठविली जातात. पण, वीजपुरवठा सुरळीतपणे सुरु ठेवण्याबाबत महावितरण कंपनी असमर्थ ठरु लागल्याचे दिसत आहे. अवाढव्य रकमेच्या वीज बिलांवरुन ग्राहक व महावितरणचे अधिकारी यांच्यामध्ये वाद होण्याचे प्रकार तर अनेक वेळा घडत असतात.

हमरापूर, जिते, खारपाडा, कोप्रोली, वाशी, शिर्की, मळेघर, कांदळेपाडा ते वडखळ भाग तसेच गडब, कासुर्डी भागांतील गावांचा वीजपुरवठा गेल्या काही दिवसांपासून रोज रात्री, मध्यरात्री खंडित होत आहे. याबाबत महावितरणच्या कार्यालयात जाऊन तक्रारी करुनही अद्यापि जैसे थे परिस्थिती आहे.

# थिनरच्या कंपनीला भीषण आग

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील कराडे खुर्द ग्रामपंचायतीच्या हद्दीतील थिनरचे उत्पादन करणाऱ्या सोनी केमिकल कंपनीला शुक्रवारी (दि. १०) दुपारच्या सुमारास आग लागली. आगीने रौद्ररुप धारण केल्याने अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण करण्यात आले. उन्हाच्या तडाख्यात दुपारची वेळ असल्याने अग्निशमन दलांना आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागले. दुपारी तीन वाजेपर्यंत पाच अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न करत होते. यानंतर आणखी दोन जवान घटनास्थळी दाखल झाले.



दरम्यान, सोनी केमिकल या लहानशा कंपनीत अंदाजे आठ ते दहा कामगार काम करतात. या कंपनीत रॉ मटेरिअलवर प्रक्रिया करुन कलरमध्ये वापरात येणारे थिनर बनविले जाते. आग लागताच तेथील कामगार कंपनीबाहेर आल्याची विश्वसनीय सूत्रांनी माहिती दिली आहे. दैव बलवत्तर म्हणून मनुष्यहानी झाली नसली तरी कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट नसले तरी आग आटोक्यात आणण्यासाठी तीन ते साडेतीन तास अग्निशामक दलाच्या जवानांना प्रयत्न करावे लागले. आग लागल्याचे समजताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, एपीआय लहांगे यांनी घटनास्थळाला भेट दिली.

## तरूणांनी रस्ता केला स्वच्छ

**खांब :** रोहा तालुक्यातील खांब-पालदाड अंतर्गत रस्त्यापैकी देवकान्हे ते धानकान्हे रस्त्यावर पडलेली ग्रीक तरूणांनी हातात झाडू घेऊन साफ केल्याने संभाव्य अपघाताचा धोका टळला आहे. मागील दोन महिन्यांपूर्वी खांब-पालदाड अंतर्गत रस्त्यापैकी देवकान्हे ते खांब या रस्त्याचे पक्के डांबरीकरण करून रस्ता सुस्थितीत करण्यात आला. मात्र पसरलेले ग्रीट जसेच्या तसे रस्त्यावरच राहिले. वळणावर पसरलेले ग्रीट दूर करणे गरजेचे असल्याने धानकान्हे येथील गावदेवी क्रीडा मंडळाच्या तरूणांनी पुढाकार घेऊन वळवावरील धोकादायक ग्रीट हटवल्याने संभाव्य अपघाताचा धोका टळला आहे. या तरुणांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# कंटेनर ताब्यात घेऊन तपासणीचे आदेश

**। उरण । वार्ताहर ।**

जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊसच्या केंद्रीय गुप्तवार्ता विभागाने (सीआययू) आयात करण्यात आलेले सुमारे १२२ कंटेनर ताब्यात घेऊन तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. चीनवरून आलेल्या या बहुतांश कंटेनरमध्ये बंदी घातलेले चिनी फटाके, महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, मायक्रो चिप्स आणि इतर अनेक प्रतिबंधित वस्तू असल्याच्या संशय आहे. कागदोपत्री खोटी माहिती देऊन हे कंटेनर पाठवण्यात आले आहेत. सीसीटीव्हीच्या देखरेखीमध्ये कंटेनर ठेवण्याचे आदेश सीआयूकडून देण्यात आले आहेत.

'मंडे होल्ड' असे नाव असलेल्या या ऑपरेशनमध्ये कंटेनर फ्रेट स्टेशन्स (सीएफएस) आणि पोर्ट टर्मिनल्सच्या सर्व व्यवस्थापकांशी संबंधित कंटेनरमधील वस्तूंच्या पावत्या, त्यांचे मूल्यांकन असलेली कागदपत्रे, परीक्षण करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व १२२ कंटेनर एकाच जहाजातून जेएनपीटी बंदरात आले आणि सध्या जेएनपीटी बंदरातील वेगवेगळ्या कंटेनर फ्रेट स्टेशन्स (सीएफएस) आणि पोर्ट टर्मिनल्सवर आहेत. यातील बहुतांश कंटेनर चीनमधून आल्याचे सूत्रांनी सांगितले.

सीआययूने या कंटेनर्सची तपासणी आणि स्कॅनिंग करून प्रतिबंधित चिनी फटाके आणि इतर प्रतिबंधित वस्तूंचा शोध सुरू केला आहे. गुप्तपणे ही कारवाई सुरू असून त्याची माहिती केंद्रीय यंत्रणांच्या ठरावीक अधिकाऱ्यांनाच आहे. कंटेनरची संख्या मोठी असल्यामुळे त्यांच्या तपासणीला बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. सीआययूकडून प्राप्त पत्रात नमूद करण्यात आलेल्या सर्व कंटेनरवर खूणा करून ते एकाबाजूला ठेवण्याचे काम सुरू आहे. कंटेनर फ्रेट स्टेशन्सचे आणि बंदरांचे उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत कंटेनरची तपासणी करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. पंजाब कॉनवेअर गोदामात आलेल्या अनेक कंटेनरच्या तपासणीदरम्यान सीमाशुल्क विभागाला या कंटेनरबाबत माहिती मिळाली होती. बंदी घातलेले चिनी फटाके आणि इतर वस्तू सापडल्या होत्या. त्यात निर्यातदाराकडून या वस्तू पाठवण्यात आल्याचा संशय आहे. त्यामुळे या चीनी पुरवठादाराकडून आलेले सर्व कंटेनर थांबवण्यात आले आहेत. त्यातील काही कंटेनर सोडण्यात आले आहेत. पण इतरांची तपासणी सुरू आहे. प्रतिबंधित वस्तूंसह कर चुकवेगिरीबाबतही तपासणी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. धूर करणारे चीनी फटाके आणि फटाक्यांची आयात सीमाशुल्क नियमांनुसार प्रतिबंधित आहे. तसेच त्यांची आयात करण्यासाठी परदेशी व्यापार महासंचालनालयाकडून आयात परवाना आवश्यक असतो. भारतात वितरण आणि विक्रीसाठी प्रतिबंधित फटाके आणि फटाक्यांच्या प्रतिबंधित माल चीनमधून तस्करी केला जातो. गोदामामध्ये उच्च दर्जाचे स्कॅनर उपलब्ध आहेत. त्यानंतरही सीमाशुल्क विभाग या सर्व १२२ कंटेनरचे प्रत्यक्ष तपासणीही करणार आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १२ ते १८ मे २०२४

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## आर्थिक उन्नती होईल

**मेष :** राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता कारण आपल्याला एकापेक्षा जास्त स्रोतांकडून पैसे मिळण्याची शक्यता दिसते. कार्यालय किंवा कार्यालयात आपल्या हाताखालच्या लोकांवर अधिक विश्वास ठेवू नका, कारण जर आपण असे केले तर ते आपल्या विश्वासाचा फायदा बेकायदेशीरपणे घेऊ शकतात आणि आपल्यास गुप्तपणे नुकसान करण्याचा प्रयत्न करतील ज्यामुळे कार्यालयातील आपली प्रतिमा खराब होऊ शकते. आपली जवळची माणसे घरी येतील, त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता क्षुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक** - १३,१४.

## कुटुंबियांची साथ लाभेल

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता नोकरी व्यवसायात परिवर्तनामुळे घरापासून दूर राहावे लागेल. आपले कुटुंबीय एका मजबूत भिंतीसारखे तुमच्यासोबत ठामपणे उभे राहतील. विद्यार्थ्यांसाठी वेळ अनुकूल आहे. स्पर्धेचा निकाल आपल्याला प्रसन्न करेल, ही विद्यार्थीवर्गासाठी चांगली बातमी आहे. मिळकतीचे नवे पर्याय उपलब्ध होतील. प्रॉपर्टीत गुंतवणूक करणे फायद्याचे ठरेल. ऑफिसमध्ये सहकर्मचाऱ्यांचे वागणे सहाय्यभूत ठरेल. कुठे तरी बाहेर जाण्याचा कार्यक्रम ठरू शकतो. जोडीदारासोबत खास क्षण घालवू शकाल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **महिलांना-** संसर्गजन्य आजारापासून तब्येत सांभाळा. महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभदिनांक-** १२,१५

## नोकरीत बदलाचे योग

**मिथुन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता, या कालावधीत नोकरी बदलण्यापासून तुम्हाला बरेच फायदे मिळू शकतात आणि हा बदल तुमच्या कारकीर्दीसाठी खूप चांगला असल्याचे सिद्ध होईल. दुसरीकडे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी मिळू शकते. या काळात बऱ्याच परीक्षांमध्ये विद्यार्थी चांगली कामगिरी करतील आणि परिणाम म्हणून खूप चांगल्या गुणांसह उत्तीर्ण होतील. जर आपण काम करत असलात, तर आपल्याला आपल्या कामाकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल अन्यथा आपल्याला आपल्या कार्यालयात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या राशीच्या लोकांना सप्ताहात व्यवसाय भागीदारीत अनेक आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. परदेशी व्यापारी लोकांसाठी वर्ष खूप अनुकूल ठरू शकते. यामुळे बरेच परदेशी संपर्क स्थापित केले जातील जे आपल्याला दूरगामी लाभ देतील आणि आपल्याला समाजात चांगले स्थान मिळेल. **महिलांना-** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. **शुभदिनांक :**१६,१७

## आरोग्याची काळजी घ्या

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात आपण थोडे आराम अनुभवाल आणि आरोग्यावरही त्याचा महत्त्वपूर्ण परिणाम होईल. सुरुवातीपासूनच ग्रह तुमच्या राशीला चांगले परिणाम देतील. विशेषतः हा कलावधी आपल्या आरोग्यावर आणि खर्चांवर परिणाम करेल आणि आपला खर्च अनपेक्षितपणे वाढू शकेल. काही वेळा अति घेतलेला ताण आरोग्याच्या कारणास्तव त्रास देऊ शकते. परंतु, सध्याची ग्रह स्थितीची सकारात्मक बाजू अशी आहे की जर आपण परदेशात जाण्यास तयार असाल, तर तुमची इच्छा पूर्ण होऊ शकते. विशेषत: आखाती देशांमध्ये आपण सहजपणे प्रवेश करण्यास सक्षम असाल. ग्रहांचा आणखी परिणाम मुख्यत: तुमच्या शिक्षणावर, तुमच्या मुलांवर, तुमच्या प्रेमाच्या आणि तुमच्या शारीरिक सुखांवर परिणाम होईल. आपण आपले वाहन घेण्यास सक्षम असाल. **महिलांना-** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक** - ११,१८

## आव्हानांवर सहज मात कराल

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या राशीच्या लोकांना या सप्ताहात काही आनंद आणि काही आव्हानांसह पुढे जावे लागणार आहे. आपण प्रत्येक आव्हानाला दृढपणे सामोरे जाण्यास सक्षम झाल्यास तर या कालावधीत उत्कृष्ट होण्यास कोणीही रोखू शकणार नाही. या सप्ताहात आपणास काही क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागेल, विशेषत: आपले आरोग्य आणि करिअर यात आव्हान असेल. हे दिवस प्रेमजीवनासाठी अनुकूल ठरू शकते, त्याच प्रमाणे कौटुंबिक जीवन, विवाहित जीवन, विवाह, मुले, शिक्षण आणि आर्थिक परिस्थितीसाठी खूप अनुकूल ठरू शकते. याचा प्रभाव मुख्यतः आपल्या कामाचे क्षेत्र, आपले कौटुंबिक जीवन, आपली वाणी, आपले आरोग्य आणि आपल्या मुलांवर होईल. कधी कडू गोड प्रसंगाने आपले विवाहित जीवन उतार-चढाव ने भरलेले असेल. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक-** १३,१६

## नात्यात हट्टीपणा करु नका

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात सुरुवातीला कोणत्याही प्रकारच्या आर्थिक गुंतवणुकीसाठी या राशीच्या लोकांनी अत्यंत सावधगिरीने पुढे जावे. या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा तज्ज्ञांकडून सल्ले घेऊन कोणतेही कार्य केले तर यश त्यांना नक्कीच यश मिळेल. सामाजिक जीवनासाठीदेखील हे वर्ष चांगले ठरेल आणि त्याव्यतिरिक्त आपण आपले वैयक्तिक संबंध अधिक अनुकूल बनवू शकता. तुम्हाला हे लक्षात ठेवायला पाहिजे की, प्रेम आणि नातेसंबंध ओळखी, आपुलकीने आणि प्रेमाने चालतात. कोणत्याही नात्यात हट्टीपणा करून कोणतीही कृती करू नका. आपल्या सभोवताल चांगले वातावरण तयार करण्यावर आपले सर्व लक्ष केंद्रित करा. आपल्या आजूबाजूची काळजी घ्या कारण असे काही लोक आहेत जे आपले नुकसान करण्याचा विचार करीत आहेत, त्यांच्यापासून सावध राहा आणि कोणतेही नवीन कार्य करताना त्या सर्व बाबींचा विचार करा. आपण करारावर सही करण्यास जात असल्यास, त्यातील प्रत्येक विषय वाचा आणि कोणालाही हमी द्या घेऊ नका. **महिलांना-** आपणास आपला रागही नियंत्रणात ठेवावा लागेल. कारण आपण एखाद्या कारणावरून वेळोवेळी भांडणे किंवा वाद घालू शकता. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक-** १२,१६

## प्रवासाचे योग फायद्याचे ठरतील

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता, या कालावधीत आपल्याला बरेच दुर्गम प्रवास करावे लागणार आहेत, जे आपल्यासाठी खूप फायदेशीर ठरतील आणि त्याद्वारे आपल्याला चांगले पैसे मिळतील आणि त्याच वेळी आपला सन्मानही वाढेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर हा सप्ताह आपल्यासाठी खूप प्रगतीशील असल्याचे सिद्ध होऊ शकते. आपल्याला या सप्ताहात आव्हानांच्या दरम्यान चांगला अनुभव मिळेल. आपल्याला केलेल्या प्रयत्नांचे चांगले परिणाम मिळतील आणि आपण अधिक मेहनत घेत राहिल्यास हे निश्चितच हे दिवस चांगले सिद्ध होऊ शकतील. आपणास जीवनात स्थिरता आवडते. आपण या दिशेने प्रयत्न केल्यास तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. आपणास आपल्या मार्गावर येण्यासाठी आणि योग्य वेळी भिन्न पर्याय निवडावे लागतील तेव्हाच तुम्ही चांगले वातावरण उपभोग करू शकाल. **महिलांना-** आपण कोणत्या प्रकारचे निर्णय घेता हे महत्त्वाचे असेल, कारण ते निर्णयांचा मुख्यतः आपल्या कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवनावर परिणाम होईल. **शुभदिनांक-**१४,१५.

## प्रलंबित कामे मार्गी लागतील

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले काम दुसऱ्यापुढे ढकलू नका आणि स्वतःची कामे स्वत: करण्याची सवय लावा. विलंब आपल्यासाठी मारक ठरू शकतो, त्यामुळे जसे जमेल तसे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा यश मिळेल. या कालावधीत आपल्या अनेक इच्छा पूर्ण होऊ शकतात, ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल आणि दीर्घकाळापासून अडकलेली कोणतीही योजना पूर्ण होईल ज्याचा तुम्हाला चांगला फायदा होईल. आपल्या पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या, कारण त्यांच्या सेवेशिवाय नशीब आणि आनंद मिळविणे अशक्य आहे. तसेच आपल्या कामाच्या क्षेत्राकडे थोडेसे लक्ष द्या, कारण आपल्याविरुद्ध काही कट रचले जाऊ शकतात किंवा कोणीतरी आपल्याविरोधात हालचाल करू शकते, ज्यामुळे आपल्याला बदनामी सहन करावी लागेल. आपले कार्य पूर्ण प्रामाणिकपणाने करा आणि कोणालाही अशी संधी देऊ नका की आपल्याला कोणत्याही समस्येचा सामना करावा लागेल. **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक-** १६, १८.

## व्यवसायात यश मिळेल

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या लोकांना आता खूप चांगले परिणाम मिळणार आहे. या कालावधीत प्रामुख्याने तुम्हाला करिअर आणि व्यवसायात यश मिळेल आणि तुम्ही तुमच्या यशाचा झेंडा फडकवाल. जे मनात येईल ते कराल. परंतु प्रामुख्याने आपल्याला आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. कारण, या कालावधीत आरोग्याची समस्या आपल्यासाठी सर्वात मोठी चिंता असू शकते. तरीही आपल्या जीवनात प्रेमाची बहार येईल आणि आपण वेळोवेळी लव्ह लाईफचा आनंद घ्याल. विवाहित जीवनात कोणतीही मोठी समस्या उद्‌भवणार नाही. छोट्या-छोट्या भांडणामुळे काहीही फरक न पडता वैवाहिक जीवनात आनंद कायम राहील. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना, ती पूर्ण करता येईल आणि त्यांना नवीन घर बांधण्याची संधीदेखील मिळू शकेल. **महिलांना-** आपला जोडीदार आपल्या प्रत्येक कामात आपले समर्थन करेल आणि वेळ आल्यावर नक्कीच मदत करेल. याचा परिणाम म्हणून तुमचे विवाहित जीवन चांगले राहू शकते. आपल्याला पैशांची चिंता करण्याची आवश्यकता नाही. **शुभदिनांक-** १५,१६

## सकारात्मक वातावरण राहील

**मकर :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सर्व काही ठीक चालले आहे. लहान-मोठ्या समस्या सोडल्या तर हा सप्ताह उत्तम चालला आहे. हा कालावधी कडू-गोड अनुभवांचा असेल. याची सुरूवात तर चांगली असेल, पण शेवटी काही समस्या भेडसावू शकतात. दीर्घ यात्रा फायदेशीर तर असतील, पण यासाठी अधिक पैसेही खर्चावे लागतील. शत्रू आपल्याला त्रास देण्याचा पूरेपूर प्रयत्न करतील, पण त्यांना यश येणार नाही. सप्ताहाच्या पूर्वार्धात खर्च अधिक होईल, ज्यामुळे धन संचयात अडचण निर्माण होईल. चांदीच्या तांब्यात वाहत्या नदीचे पाणी भरून ठेवल्यास फायदा होईल. या सप्ताहाच्या मध्यात सावध राहणे फारच गरजेचे आहे. कोणीतरी आपल्याविरुध्द कट रचत आहे. हलकीशी चूक आपल्याला महागात पडू शकते. एका मांगलिक कार्याचा योग जुळत आहे. सकारात्मक वातावरण कायम राहील. फार मेहनत करावी लागेल. हो, त्यानुसार फळही मिळेल. इच्छीत लाभाने आनंद होईल. **महिलांना-** स्त्रियांनी तब्येतीची काळजी घ्यावी. वजन वाढेल. नोकरीत पदोन्नती शक्य आहे. तब्येतही थोडी नाजूक राहील. **शुभ दिनांक-** १२,१७.

## रागावर नियंत्रण ठेवा

**कुंभ :** या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्ही चिंतित राहाल. शत्रू पक्ष तुमच्यावर हावी होऊ शकतो. भौतिक साधनांवर निरर्थक पैसे खर्च होण्याची चिन्हे दिसत आहेत. लक्षात असू द्या, क्रोध सगळ्यात आधी तुमचे नुकसान करतो, म्हणून रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वैवाहिक जीवनात संशय घातक ठरू शकतो. या विषयावर जोडीदारासोबत चर्चा करून तोडगा काढा. बाहेर खाणे टाळा, नाहीतर आरोग्यावर याचे वाईट परिणाम दिसून येतील. तरीही तुमच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. नवे वाहन किंवा घर वगैरे खरेदी करु शकता. मित्र प्रत्येक अडचणीत तुमची साथ देतील. सासरच्या लोकांकडून साहाय्य मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. कॉम्प्युटर व्यवसायाशी संबंधित लोकांसाठी वेळ चांगली असरणार आहे. शत्रूंची प्रत्येक चाल अयशस्वी ठरेल. **महिलांना-** नव्या संबंधांचा फायदा होईल. काहीतरी नवे घडणारच आहे. तुमच्या अपत्याला तुमचा वेळ हवा आहे, हे ध्यानात असू द्या. सुख आणि धन प्राप्तीचे संकेत आहेत. सांध्यांचे दुखणे किंवा शल्यचिकित्सा होऊ शकेल. **शुभ दिनांक-**१३,१७

## मेहनतीचे फळ मिळेल


**मीन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्हाला इच्छेनुसार फळ मिळेल. जोडीदार प्रसन्न आणि अपत्य संतुष्ट राहतील. एकुणच तुमच्यासाठी हा चांगला सप्ताह आहे. कोणीतरी तुमच्यावर नजर ठेवून आहे. यासाठी आपले काम पूर्ण प्रामाणिकपणे करा. सावध रहा, मेहनतीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. पण ही वेळ विद्यार्थ्यांसाठी प्रतिकूल वेळ आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी मात्र सर्वकाही सामान्य राहील. म्हणजेच मेहनतीला पर्याय नसेल. नव्या लोकांच्या ओळखी होतील, ज्या पुढे लाभदायक ठरतील. नोकरीसाठी एखाद्या नव्या शहरात जाऊ शकता. अडकलेले धन परत मिळेल. वसुली करून घ्या. जोडीदार तुमच्यासाठी धावून येईल, त्याचे प्रेम सिद्ध होईल. जोडीदाराचे तुमच्याप्रतीचे वागणे सहाय्यकारी असेल. स्पर्धेला घाबरू नका, त्याचा आनंद लुटा, मग पाहा काम करताना किती मजा येते ती. **महिलांना-** धार्मिक कृत्यांप्रती रूची वाढवाल. तुमच्या जीवनात काहीतरी नवे होणार आहे. वाटेत काही अडचणी येतील, पण तुम्ही त्या पार कराल. कुटुंबात वातावरण ठीकठाक राहील. तीर्थयात्रेचा लाभ होईल. **शुभ दिनांक-** १४,१६

मोहोर

**माझ्या मते, जीवन म्हणजे एक 'परतफेड' होय. ज्यामध्ये जगताना प्रत्येकाला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर परतफेड करावी लागते. कधी घ्यावे लागते, तर कधी द्यावे लागते. माणसे बदलतात, नाती बदलतात; पण 'परतफेड' कायम राहते. चला तर ती परतफेड काय आहे हे आपण समजून घेऊया..**

# परतफेड..!!

अमोल चंद्रशेखर भारती




कॉलेजला असताना म्हणजे कॉलेजच्या शेवटच्या दिवसात मित्रांकडून एक स्लॅम बुक लिहून घेतल्या जायचे, ज्यात मैत्री म्हणजे काय? जीवन म्हणजे काय? असे अनेक प्रश्न असायचे. ज्याचे उत्तर आपल्या वयानुसार, ज्ञानानुसार, अनुभवानुसार दिले जायचे. पण त्यातला जीवन म्हणजे काय? हा जो प्रश्न होता त्याला आपले अनुभव कमी पडायचे. तरीसुद्धा अनुभव काहीही असो प्रत्येकाच्या हिशोबाने उत्तर दिले जायचे. ज्यात कोणी म्हणायचे 'जीवन म्हणजे जन्म व मरणाचा प्रवास'; 'जीवन म्हणजे दोन घडींचा डाव'; 'जीवन म्हणजे एक संघर्ष', वैगरे बरेच अर्थ ज्याच्या त्याच्या परीने काढले जायचे. जीवनाची व्याख्या कळायला व ते समजायला प्रत्येकाला जगण्याचा विशिष्ट टप्पा पार करावा लागतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने जीवन कळते. मला आज जे काही माझ्या अनुभवाने कळाले ते मी मांडणार आहे. जीवनाचा मीही एक अर्थ काढला आहे. तो मी सांगणार आहे. माझ्या मते, जीवन म्हणजे एक 'परतफेड' होय. ज्यामध्ये जगताना प्रत्येकाला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर परतफेड करावी लागते. कधी घ्यावे लागते तर कधी द्यावे लागते. माणसे बदलतात, नाती बदलतात पण 'परतफेड' कायम राहते. चला तर ती परतफेड काय आहे हे आपण समजून घेवुया..

भारतीय विवाह परंपरेत 'मूळ' देण्याची एक पद्धत आहे. कोणीतरी सुरुवातीला दुसऱ्याला मूळ देतो. मग त्याने आपल्याला मूळ दिले होते म्हणून हा पण देतो. कधी कधी अशाच लग्नसमारंभात अनेक पाहुण्यांच्या घोळक्यात एखादा गटात न बसणारा पाहुणा दिसतो, याचा अर्थ अगोदर त्या गटात न बसणाऱ्याने या बसणाऱ्याला त्याच्या गटात कधीतरी बोलवलेले असते. ही झालेली सळमिसळ केवळ परतफेड करण्यासाठीच होती. आपल्याकडचे लोकं विनाकारण कोणाला चहा पाजत नाहीत किंवा विनाकारण कोणाला जेवायलाही नेत नाहीत. तसे करण्यासाठी पण एक अट असते ती म्हणजे परतफेडीची. त्याने आपल्याला दिले होते म्हणून आपण पण देवू. नाही काही दिले तर काहीच नाही द्यायचे. यामध्ये बरेच महाभाग असेही असतात, समोरच्याने कधी आपल्याला काय दिले होते? किती वेळा दिले होते? हे बरोबर ध्यानात ठेवतात आणि बरोबरीने परतफेडही करतात. कधीही स्वतः कडून जास्त जाऊ देत नाहीत. चुकूनजर पुढच्याकडून अधिक प्राप्त झाले तर झाले. वाढदिवसाला शुभेच्छाही तोलून मापून दिल्या जातात. एवढेच काय तर वाढदिवसाच्या शुभेच्छांचे व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसही परतफेडीसाठीच ठेवतात. परतफेड करायची म्हणून करतात. गिफ्ट द्यायचे असेल तर त्याने दिले म्हणून द्यायचे, नाही दिले तर नाही द्यायचे. पुढच्याचे गिफ्ट ज्या किमतीचे होते त्याच किमतीचे द्यायचे. लग्नसमारंभातही हाच नियम पाळला जातो. त्यांचा आहेर भारीचा तर आपला पण! त्यांचा हलका तर आपण पण हलकाचा देवू. मग आपली हैसियत काही का असेना.

आई-वडील मुलांना जन्म घालतात. त्यांना शिकवतात. स्वत:च्या पायावर उभे करून मोठे करतात. मग मुलांची पाळी असते आईवडिलांना सांभाळायची. ही एक पूर्वापार चालत आलेली परतफेड होय. ज्याला आपण कर्तव्य म्हणतो. यामध्ये कधी कधी परतफेडीचे नियम बरोबर पाळले जातात. म्हणजे जे मुलं आपल्या आईवडिलांना सांभाळत नाहीत, त्यांची मुलं पुढे त्यांना सांभाळायला कर्तव्य समजत नाहीत. कारण ती जे पाहतात तशीच ती वागतात, तसे ती समजतात.

एकमेकांना मदत करणे हादेखील एक परतफेडीचाच भाग आहे. संकटकाळी केलेली मदत आपण ध्यानात ठेवतो आणि पुढच्या व्यक्तीला वेळ आली तेव्हा आपण नक्कीच धावून जातो. कारण आपल्याला केलेली मदत आपण कधी विसरत नाही. ती विसरायची पण नसते. जो विसरतो तो कृतघ्नच असतो.

परतफेडीच्या बाबतीत लोकं जाणीवपूर्वक काही गोष्टी विसरतात. जसे ज्ञान घ्यावे तसे द्यावे. पण बरेच जण असे करताना दिसत नाहीत. कारण त्यांना आपल्यापेक्षा कोणीतरी सज्ञान व्हावे असे वाटत नाही. एखाद्याला एखादी गोष्ट कोणाच्या आधी समजली तर ती दुसऱ्यांना लवकर समजू नये म्हणून स्वत:कडून न कळविण्याची पुरेपूर काळजी घेतल्या जाते. म्हणजे ज्ञान देण्याला आपण परतफेड समजतच नाही. दुसरी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, प्रत्येक वेळी ज्याने आपल्याला काहीतरी दिले तर परतफेड त्यालाच करावी? का? कधी आपण होऊन दुसऱ्याला मदत करून स्वतः पासून सुरुवात केलेली वाईट आहे का? कारण एखाद्याच्या परतफेडसाठी त्या वेळेची वाट पाहणे यापेक्षा ज्याला गरज आहे त्याला देणे महत्वाचे नाही का? परतफेड ही आत्म संतुष्टीसाठी आपण करतो. ते एक प्रकारचे समाधान आहे. म्हणजे माझे आता कोणाला काही देणे नाही. पण हीच आत्मसंतुष्टी स्वत:पासून सुरुवात केली तरी चालू शकते. त्यासाठी आपल्यापैकीच कोणीतरी चांगल्या कामाची सुरुवात करावी लागेल आणि ती व्यक्ती आपण स्वतः होत असू तर चांगलेच. जर असे नाही केले तर परतफेड नावाची ही प्रक्रिया कशी सुरू होईल. प्रत्येकवेळी पुढच्याने जे दिले तितकीचे तोलून मापून परतफेड करणे हे पण योग्य नाही. कधी जास्त तर कधी कमी पण होऊ शकते. त्या वेळची गरज काय? हे महत्वाचे आहे. हा विचार दोन्हीकडच्या व्यक्तींनीही तितकाच विचार करून करायला हवा.



बऱ्याच वेळा आपल्याला जे दिलेले आहे, ते असूनही दिसत नाही. याचा अर्थ, आपण परतफेड करायची नाही असा होत नाही. जसे निसर्ग आपल्याला खूप काही देतो. मग या निसर्गाच्या निकोप वाढीसाठी आपण झाडे लावणे, प्रदूषण कमी करणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, ही परतफेड करायला काय हरकत आहे. एखादे विद्यमान सरकार आपल्या गरजा पूर्ण करत नसेल तर त्यांना त्यांची जागा मतदान करून दाखवणे ही एक परतफेडच आहे. म्हणजे ज्या गोष्टी अदृश्य असतात, त्या नसतात असे नव्हे. तो शोध आपल्याला घेता आला पाहिजे आणि वेळ साधून परतफेडही करता आली पाहिजे.

नातेसंबंधात परतफेड खूप महत्त्वाची आहे. यामध्ये सुखावणे कमी, दुखावणेच जास्त असते. दुखावण्यामागचे कारण इतकेच, की आपण समोरच्याकडून अपेक्षा जास्त ठेवतो आणि स्वत:ची द्यायची वेळ आली की आपले कर्तव्य नाही किंवा आपण बांधील नाही म्हणून मागे हटतो. त्यावेळस आपण समोरच्याचा विचार एक माणूस म्हणून करायला हवा. नेहमी जावयाला सासरच्यांनी काही न काही द्यायचे आणि जावयाची द्यायची वेळ आली की आपण बांधील नाही म्हणून मागे सरायचे. हे काही बरोबर नाही. भावाने बहिणीचे रक्षण करायचे हे पूर्वापार आपण ऐकत आलोय. जी गोष्ट आपण मनेभावे पाळलीसुद्धा. यात रक्षण म्हणजे काय? तर केवळ शत्रूपासून संरक्षणच नव्हे तर, बहिणीला भावनिक आधार, आर्थिक हातभार लावणे म्हणजे तिचे येणाऱ्या संकटापासून रक्षणच होय की! मग असाच आधार भावालापण लागत असेल, नाही का? ज्या बहिणी हक्काच्या बाता करतात त्यावेळेस भाऊ म्हणून त्याचादेखील बहिणीवर तितकाच अधिकार असायला हवा. जर ती मदत करण्यास स्वत:च सक्षम नसेल, तर आपण ते समजू शकतो. पण सगळे व्यवस्थित असून, वेळ आली तेव्हा तिचा आधार जर भावाला नसेल, तर याला परतफेड नाही म्हणता येणार. नाती तेव्हाच टिकतील जेव्हा हा परतफेडीचा नियम पाळला जाईल. उगाच दुसऱ्यावर तोच नियम लादून नाही. एक मित्र भावापेक्षा जवळचा का वाटतो, कारण त्या मैत्रीमध्ये परतफेड पुरेपूर पूर्ण केल्या जाते. कधी चुकले तर समायोजन पण साधले जाते.

निव्वळ खाणे-पिणे आणि दगदग म्हणून रोज पळणे केवळ यालाच जीवन नाही म्हणता येणार. या सर्व दुव्यांना जोडणारा दुवा ही खरी परतफेड असते. ज्याला हा दुवा कळतो आणि जो हा दुवा पक्का धागा म्हणून विणतो तोच खरे आयुष्य जगतो आणि इतरांना समजू शकतो.

सगळ्यात महत्वाचे, परतफेड म्हणजेच सर्व नाही. पण सर्व नसली तरी ती जीवनाचा अविभाज्य भाग नक्कीच आहे. ज्याला आपण टाळू शकत नाही; टाळू नाही. जगण्याच्या नादात जो नको त्याचा वाद करतो त्याला त्यातला स्वाद कळत नाही. जो जगला इतरांसाठी त्याएवढा कोणी गुणी नाही.

धन्यवाद!

**

# आंब्याचे झाड, परंपरा आणि पर्यावरण

कोकणस्पंदन

धनंजय शेट्ये

आंब्याच्या झाडावर मोहर दिसू लागताच मन आनंदविभोर होऊन नाचू लागतं. आंब्याच्या मोहरफुलांचा आंबटगोड सुगंध मन वेडावून सोडतो. आंब्याच्या मोहराला पाहून कोकीळ पक्षीही गाऊ लागते, याचे कारणही तसेच असावे. आंब्याचे डेरेदार वृक्ष अंगाखांद्यावर घेतलेल्या मोहराने अधिक सुंदर दिसत असते. पक्ष्यांचा चिवचिवाट, मधमाशांचे रुंजी घालणे. लहानथोर माणसेही हा आंब्याच्या झाडा जवळ उगाचच फेऱ्या मारुन कैरीच्या प्रतिक्षेत असल्याचे जाणवते.

कैरी म्हणजे कच्चा आंबा. आंबा फळांचा राजा म्हणून ख्यातनाम आहे. जास्तीत जास्त लोकांना रसाळ, गोड गंध पसरविणारा हापूस आंबा खायला आवडतो. हापूस, केशरी हे विशेष चवीष्ट आंबे अशी लोकांची समजूत आहे, पण रायवळ आंब्याच्या अनेक भन्नाट अशा वेगवेगळ्या आंबटगोड हजारो चवी असतात! प्रत्येक आंब्यात चवीत सारखेपणा नसतो. त्यात बिटकी आंबा लहान आकाराचे असतात.बिटकीच्याही अनेक प्रकारच्या चवी असतात.आंब्या वेगवेगळ्या चवीनुसार त्या झाडांनाही नावं ठेवलेली असायची, पेरु, आंबा, चिकू आंबा अशी. काजयाळी आंबा हा एक प्रकारचा आंबा आहे चवीत थोडासा डिंक असतो. मिरमिरा आंबा चवीनं चाखाण्याचा एक वेगळाच आनंद असतो. त्या सर्व चवी चाखण्यात एक वेगळाच आनंद असतो. कोकण म्हणजे आंब्याचे पंढरपूरच! अस्सल कोकणी माणूस हापूस आंब्यापेक्षा रायवळ आंबा चवीने चाखतो. तय्यार आंबे एकवीस दिवस गवताच्या अढीमध्ये ठेवले जातात. त्या अढीमधल्या आंब्यांची चव काय चाखाल? जणू अमृतच!! पण, या सर्वांत जास्त जवळची म्हणजे कैरी होय. कैरीला फक्त मीठ-मसाला लावून खाल्ली तरी एक वेगळीच चटकदार चव असते. नुसत्या कल्पनेनेच काहीजणांच्या तोंडाला पाणी सुटले असेल. कैरीचे लोणचे, कैरीचे पन्हे, मुरांब्बा ह्या प्रधान गोष्टी होय. पण, आम्ही कैरीची करीसुद्धा बनवतो. कैरीची आमटी चटकदार चवीष्ट असते. शाळकरी विद्यार्थीदशेत तर आम्ही सामुदायिकपणे एक एक जण मीठ, मसाला, तेल हे आणून आंब्याच्या वनात कैरीचं लोणचं पार्टी करायचो. कैरीचं लोणचं बनवून तिथेच खाऊन संपवायचो. बालपणीचा काळच सुखाचा होता. कोवळ्या कैरी खारात घालून ठेवल्या तर वर्ष वर्ष टिकायच्या. प्रत्येकाची पंधरा-वीस धरतीझाडे असायची. धरतीझाडे म्हणजे फळ लागणारी झाडे. आम्हा मुलांना भरपूर प्रमाणात आंबे उपलब्ध असायचे तरीही भल्या पहाटे वाऱ्याने पडलेले रायवळ आंबे गोळा करण्याचा आम्हा मुलांचा एक वेगळाच छंद होता. आंब्या-काजूच्या मोसमात आम्हाला कधी भूक लागतच नसे. आंबा, फणस, करवंदे या मेव्याचा मनसोक्त आस्वाद घेत असू. त्यामुळे जेवणाची कधीकधी आठवणही होत नसे. आब्या-फणसामुळे पोटं तुडुंब भरलेली असायची.



आंबा धार्मिक कार्यातही सन्मानाचे स्थान मिळवून आहे. आंब्या पानांचे तोरण बांधून घर प्रसन्न केले जाते. सर्व पूजाविधीमध्ये आंब्याच्या झाडाच्या पानांना सर्वोच्च स्थान आहे. कलशपूजनात आंब्याच्या डहाळीचा वापर केलेला असतो. लग्नकार्यातही आंब्याच्या झाडाच्या पानांना विशेष महत्त्व आहे. आमच्या मालवण प्रांतात काही गावात आजही एक वेगळी प्रथा आहे. कोणाच्या घरी कोणाचे निधन झाले तर पाहुणेपैकाना ही बातमी समजावी, दु:खी घर समजावे म्हणून घराच्या अंगणात दारासमोर आंब्याच्या ओल्या फांद्या तोडून टाकल्या जातात. ही सांकेतिक परंपरा आजही काही भागात जपली जाते. आजही काही ठिकाणी अंत्यसंस्कारासाठी फक्त आंब्याचे झाड परंपरेनुसार वापरले जाते.आंब्याची ओली लाकडेसुद्धा डिंकामुळे भरभर पेट घेतात. त्यामुळे पावसाळ्यातही अंत्यसंस्कारासाठी आंब्याचे झाड उपयुक्त ठरत होते. शिवाय मालवण तालुक्यातील काही गावात प्रत्येकाची दहा-पंधरा तरी आंब्या-फणसाची झाडे आहेतच. त्यामुळे ती प्रथा टिकून असावी. वृक्षतोड अशा कारणांसाठी करून पर्यावरणाचा समतोल बिघडवणे चूकीचे आहे. बाराबलुतेदारीच्या वस्तूविनिमयाच्या काळात धार्मिक विधीत जायवळ, मुंडे केले जायचे, ते कापलेले केस आंब्याच्या झाडाच्या मुळात टाकले जायचे मग ते झाड ते केस कापणाऱ्या व्यक्तीला दान म्हणून दिले जायचे. तो त्या झाडाची फळे हक्काने खायचा. काही का असेना आंब्याचे झाड वाढवायला बरीच वर्षे लागतात. अशी झाडे म्हणजे निसर्ग हीच खरी संपत्ती आहे. त्यामुळे धार्मिक विधीसाठी अशा झाडांची होणारी कत्तल थांबवली पाहिजे. सामाजिक परिवर्तन घडवून आणले पाहिजे. वृक्षसंवर्धन, वृक्षसंगोपन, वृक्षजतन करणे ही काळाची गरज आहे, याचे भान सर्वांनाच असायला हवे.

**

## "आमदार भाई जयंत पाटील''

एक झुंझार लढवय्या
नेता आहे
शेतकरी कामगार पक्षाचा,
सन्मानीय-आदरणीय
भाई जयंत पाटील
साहेब आमचा..
पुत्र आहे तो जनहित
जपणाऱ्या
कै. प्रभाकर पाटील
साहेबांचा ।।१ ।।
राजकारणाचा
वारसा त्यांना त्यांच्या
आजोबांनकडून लाभला,
भाई जयंत पाटील
यांच्याचमुळे कित्येकांच्या
डौलाने डुलतात माना
राजा आहे जसा तो,
शेतकरी कष्टकरी बंधू
आणि भगिनींचा।।२।।
अन्याय, अत्याचार,
अन्यायाविरुद्ध लढणारा
हा नेता
आजही समाजात
मानतात त्यांना, लेकी-सुना
आया-बहिणी-माता
सर्वश्रुत नेता आहे तो
शेतकरी कामगार
या पक्षाचा।।३।।
आजही ते दीनदुबळ्या व
आडल्या-नडल्यांचे
आश्रु पुसत आहेत
वक्तृत्व आणि कर्तृत्व
त्यांचे जनहिताचे आहे
महाराष्ट्राच्या
राजकारणातही आजही नाव
गाजत आहे त्यांचे।।४।।
आर.डी.सी. बँकेचे नाव
आपल्या देशात प्रगती
पथावर नेणारा
नेहमीच आपले मत
सर्वांसमोर रोखठोकपणे
मांडणारा
शांत, सयंमी, मनमिळावू
स्वभाव आहे, जयंतभाई
पाटील साहेबांचा।।५।
जयंत भाई पाटील साहेब
तुमच्या सदैव पाठीशी
आहोत आम्ही,
तुमच्या सत्विचारांचा
पसारा गावा गावाला करीत
आहोत आम्ही,
जयंतभाई पाटील साहेब
मीही आज मुजरा करतो
तुम्हा मानाचा।।६।।

- लवेंद्र मोकल
(कळवे-पेण)

# लोकशाहीच्या उत्सवाचा पुन्हा एकदा जागर!

**लोकशाही मार्गाने होणाऱ्या निवडणुका एक सबळ राज्यकर्ते निर्माण करतात. परंतु, या राज्यकर्ते असलेल्यांची राजकारण इतक्या विकृत थराला गेले आहे की मतदारांना प्रश्न पडतो की आपण ज्याला मत दिले आहे, आपण ज्या राजकीय विचाराला मत दिले आहेत, ते उमेदवार, पक्ष अन्य परस्पर विरोधी पक्षाला जाऊन भेटून आपल्या अपेक्षांचा बळी का देतात? निवडणुकांमधून निवडून आलेला उमेदवार पक्ष जेव्हा आपल्या विचाराच्या विरूद्ध जाऊन अन्य परस्पर विरोधी पक्षाला भेटतो, तेव्हा खरंतर मतदारांचा घात झालेला असतो.**


आचार-विचार

विलास पवार

निवडणुका हा तर लोकशाहीचा उत्सव यात सहभागी होणारे उमेदवार, मतदार, शासकीय यंत्रणा, पोलीस यंत्रणा, माध्यम यंत्रणा आणि अन्य सर्व यंत्रणा जागर निवडणुका झाल्यापासून सुरू होतो. अनेक विचारांची गाळवने मतदारांच्या मनाला, मेंदूला येऊन धडकतात, अनेक प्रकाराच्या आचार, विचार प्रकटनाने परिस्थिती स्फोटक होऊ नये म्हणून आचारसंहितेचा दंडुका दाखवला जातो. पाच वर्षाने येणारा हा लोकशाहीचा उत्सव सर्व प्रकारच्या भूमिका बजावणाऱ्यांनी रंगीबेरंगी ठेवलेला असतो. जाहीर भाषणे, जाहीर शाब्दिक फेकाफेकी, जाहीरनामा, वाचन, एकमेकांच्या विरोधकांच्या नकला करणे हे यथेच्छ चालू असते. या निवडणुकांच्या दरम्यान, लोकशाहीच्या उत्सवाचा जागर चालू असताना अनेक गोष्टी घडत असतात. काही गोष्टी भूतकाळातल्या, काही वर्तमानकाळातल्या असतात. पण, या भूतकाळातल्या आणि वर्तमानातल्या 'काही' गोष्टींमुळे भविष्यातल्या अनेक प्रश्नांना जन्म दिलेला असतो. ज्या गोष्टी जन्माला येणार आहेत, त्या चांगल्या की वाईट हा प्रश्न विचार करण्याचा नसतो, तर काही भावनिक, काही वैचारिक गोष्टींचा या लोकशाहीच्या उत्सवात बळी दिला जातो. परस्पर नातेसंबंधांचा बळी दिला जातो, याचा विचार करावा लागतो.



आपल्या देशात सर्व राज्यात निवडणुका जाहीर झाल्यानंतर एक विशिष्ट विचारवृत्ती स्पष्ट होताना दिसते, एक विशिष्ट लाट आपल्या आजूबाजूला अस्तित्व निर्माण करते. हे असे होणे गरजेचे आहे. पण, या लाटेत अनेक नातीसंबंधी उखडली जातात, अनेक मैत्रीच्या नात्यांना सुरुंग लावले जातात. अनेक आदर्शवादाला मूठमाती दिली जाते. तेव्हा मात्र आपण निवडणुकांमुळे कायमस्वरूपी समस्यांना तोंड द्यायला लागतो.



महाभारत, रामायण ही आपले धार्मिक ग्रंथ आहेत. महाकाव्य आहेत. यामध्ये जीवनातल्या अनेक अंगांना सामोरे जावे लागणारे प्रसंग आहेत, राजकारण आहेत, नातेसंबंधातले ताणतणाव स्पष्ट शब्दरूपाने स्पष्ट आहेत. आपण आता यापेक्षा वेगळे काही पाहात आहोत का? हा आता प्रश्न आहे. निवडणुकांमध्ये काका-पुतणे, भाऊ-भाऊ, वडील-मुलगा, वडील-मुलगी, नणंद-भावजय, बहिणी-बहिणी, आई-मुलगा, सासू-सून,सासरे-जावई, आजोबा-नातू आपल्या प्रत्येकाच्या जीवनात असलेली नातेसंबंधी परस्पर विरोधात उभी असलेली पाहतो. प्रत्येकाच्या घरात नातेसंबंधातला विरोध वैचारिक स्तरावर असतो, कधीकधी परस्परविरोधी भूमिकांसाठीसुद्धा स्पष्ट होतो. परंतु या निवडणुकीत वर म्हटल्याप्रमाणे नातेसंबंधाचे बळी घेणाऱ्या निवडणुका उत्सव म्हणून अशा स्वीकारायच्या. कालपरवा एका ताटात जेवणारे, राजकीय भूमिका बदलली तर, राजकीय नेतृत्व बदलले तर घास भरवणे एकमेकाच्या नरडीचा घोट घ्यायला तयार होतात. गळ्यात गळा घालून राहणारे एकमेकांची डोकी फोडायला निघतात. काही घेणे देणे नाही अशा पक्षाची पक्ष नेतृत्वाची बाजू घेऊन एकमेकांचे सगे सोयरे, मंडळी हमरीतुमरीवर येतात. प्रत्यक्षात जीवनाच्या लढ्यात, आर्थिक सहभागात नसलेल्या लोकांसाठी जीव मेटाकुटीला येईपर्यंत भांडण करणारी मंडळी या निवडणुकीच्या उत्सवात दिसतात. लोकशाही मार्गाने होणाऱ्या निवडणुका एक सबळ राज्यकर्ते निर्माण करतात. परंतु, या राज्यकर्ते असलेल्यांची राजकारण इतक्या विकृत थराला गेले आहे की मतदारांना प्रश्न पडतो की आपण ज्याला मत दिले आहे, आपण ज्या राजकीय विचाराला मत दिले आहेत, ते उमेदवार, पक्ष अन्य परस्पर विरोधी पक्षाला जाऊन भेटून आपल्या अपेक्षांचा बळी का देतात? निवडणुकांमधून निवडून आलेला उमेदवार पक्ष जेव्हा आपल्या विचाराच्या विरूद्ध जाऊन अन्य परस्पर विरोधी पक्षाला भेटतो, तेव्हा खरंतर मतदारांचा घात झालेला असतो. ज्या पक्षाच्या वैचारिक संहितेला, जाहीरनाम्याला आधार म्हणून पक्षाच्या उमेदवाराला निवडून दिलेले आहे. त्या उमेदवाराने, पक्षाने, मतदारांचा कौल घ्यायला नको? आज देशात, आपल्या राज्यात तरी असे होताना दिसत नाही. लाटा फुटाव्या तशा पक्ष फोडले जात आहेत. फुटले जात आहेत. निवडणुका लोकशाहीचे उत्सव असले तरी त्याचा त्रास पक्षाला, उमेदवाराला कधीच होत नाही. प्रचार करताना जे काही कष्ट घेतले जातात, त्या बळावर पाच वर्ष सत्ता उपभोग घेतात. आज त्याची चलती आहे.

सर्वसामान्य जनता, सर्वसामान्य मतदार हा या उत्सवातला कुटील भाग समजतच नाही. लोकशाहीच्या उत्सवात त्यांच्या इच्छा-आकांक्षेचा बळी जात आहे, हे त्यांच्या खिजगणतीतच नसते. पुन्हा एकदा निवडून आलेला उमेदवार, एकमेकांशी संबंध नसलेली राजकीय पक्षांची सत्तारूढ झालेली 'मिसळ' जनतेच्या माथी मारली जाते. पुन्हा एकदा पुढल्या लोकशाहीच्या उत्सवाची वाट पाहात असलेल्या वाटेने पुढे जावे लागते.

**

# आईपलीकडची स्त्री...

**आई आणि मातृत्व वृत्ती यांच्यात गल्लत होऊ नये. स्त्री ही व्यक्ती म्हणून उत्तम असेल तर ती आई म्हणूनही उत्तमच असते. जिजामातेसारखी मातृत्व वृत्ती असेल तरच शिवाजी घडतात. मुलांना सतत उपदेश देऊन, तुलना करून, अनेक क्लासेसना पाठवून संस्कार होत नसतात. पालकांची दैनंदिन, प्रासंगिक वागणूक आणि कौटुंबिक वातावरणातून संस्कार आपोआप झिरपतात. म्हणूनच 'आई तू कशाला काही करते?' असे म्हणावेसे वाटते**

**डॉ. साधना कुलकर्णी**

परवा वर्तमानपत्रात एका खटल्याच्या निकालाची बातमी वाचली. खटल्याच्या तपशिलात शिरायची गरज नाही. एका पतीने पत्नीकडून आपल्या मुलीचा ताबा मिळावा यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. वर्षभरापूर्वी त्या दोघांचा घटस्फोट झाला तेव्हापासून मुलगी आईजवळ राहत होती. पतीच्या बाजूने ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आणि मानवी हक्क कार्यकर्ता इंदिरा जयसिंग यांनी युक्तिवाद केला. 'मुलीच्या आईचे विवाहबाह्य संबंध असल्यामुळे मुलीला आईच्या ताब्यात देणे योग्य नाही' असे मत त्यांनी युक्तिवादात मांडले. यावर उच्च न्यायालयाने दिलेले उत्तर असे की, 'चांगली पत्नी नसणे, याचा अर्थ संबंधित महिला चांगली 'आई' नाही असा नव्हे. व्यभिचार हे घटस्फोटाचे कारण असू शकते. परंतु अपत्याचा ताबा आईकडे न देण्याचे ते कारण असू शकत नाही.' असे निरीक्षण नोंदवून मुलीचा ताबा आईकडे देण्यात आला. आता मुद्दा असा आहे की 'आई' असणारी आणि 'व्यभिचार करणारी' व्यक्ती तर एकच आहे. इंदिरा जयसिंग यांनी महिलेच्या 'वागणुकीचा' निकष लावला तर उच्च न्यायालयाने 'आई' हा निकष लावला. म्हणजे फक्त आई असणे हे एक असामान्य गुणवैशिष्ट्य आहे का? यासंदर्भात महाभारतातील कुंतीची कथा आठवणे अपरिहार्य आहे. दुर्वास ऋषींनी शिवसेन राजाच्या कन्येवर, कुंतीवर प्रसन्न होऊन वर दिला होता. ज्या देवाचे स्मरण करशील, तो देव वश होईल अशी ती शक्ती होती. लग्नापूर्वी कुंतीने सहज सूर्य देवाचे स्मरण केले. सूर्य देव प्रगट झाले आणि त्यांनी कुंतीच्या नाभीला बोट लावले. 'तुला माझ्याप्रमाणेच तेजस्वी पुत्र होईल...' असा आशीर्वाद देऊन ते अंतर्धान पावले. आणि खरोखरच कुंतीला सूर्यपुत्राचा लाभ झाला. या अनपेक्षित घटनेने कुंती घाबरून गेली. समाजाच्या भीतीने तिने सूर्यपुत्राला नदीत सोडून दिले आणि हे सत्य दडवून ठेवले. आता या प्रसंगी कुंतीने कशाला प्राधान्य दिले हे तर सर्वश्रुतच आहे. म्हणजे एका स्त्रीच्या व्यक्तिमत्वात आई असण्याबरोबरच अनेक गुण-अवगुण एकवटले असतील तर केवळ ती आई आहे म्हणून श्रेष्ठ ठरते का?



आपल्या संस्कृतीने मातेचा नेहमीच गौरव केला आहे. किंबहुना, मातेला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी।', 'न मातु :परदैवतम्।', 'कुपुत्रो जायते क्वचिदपि, माता कुमाता न भवति।', 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.' 'देवाला प्रत्येक ठिकाणी जन्म घेणे शक्य नव्हते म्हणून त्याने आई निर्माण केली'.

असे आणि यासारखे असंख्य वाकप्रचार ,सुभाषिते श्लोकांनी प्रत्येक भारतीय मनाचे सॉफ्टवेअर तयार झाले आहे. ही उपरोक्त ब्रह्मवाक्ये शाळेत निबंधात लिहून, पाठ करून, आईबद्दल अतिउदात्त धारणा प्रस्थापित झाल्या आहेत. आई म्हटले की ममतेचा सागर, त्यागमूर्ती, आदर्श, वात्सल्य, करुणा इत्यादी घासून गुळगुळीत झालेले शब्द वापरलेच पाहिजेत, असा असा एक अलिखित नियम आहे. याशिवाय चित्रपट, मालिकांमध्ये दाखवलेली आई तर अतिरंजित रूपात असते. ऐन कसोटीच्या, जीवन-मरणाच्या प्रसंगात ही सिनेमातली आई मुलासमोर भात्यातले एक ब्रह्मास्त्र सोडते. 'मैने तुम्हे नौ महिने अपने पेट मे पाला है....' प्रत्यक्ष ब्रम्हदेवाला आव्हान देणारे हे 'भावनिक ब्रम्हास्त्र'. मुलाला क्षणात गारद करणारे!

वास्तविक, नऊ महिने बाळाला पोटात सांभाळणे हा काही विश्वपराक्रम नाही; जन्मणाऱ्या बाळावर केलेले उपकार तर नाहीच नाहीत. ही अत्यंत नैसर्गिक अशी शारीरिक घटना आहे, ज्यात भावी आईचे काहीही कर्तृत्व नाही. 'तुला नऊ महिने पोटात वाढवले आणि तुझ्यासाठी खस्ता खाल्ल्या'... हे वाक्य उठसूठ हुकमी एक्क्यासारखे का म्हटले जाते, हे अनाकलनीय आहे. 'गाजर का हलवा' खाऊ घालणारी, सतत टिपे गाळणारी, मशीनवर कपडे शिवणारी, डोक्यावर घमेले घेऊन दगड उचलणारी, स्वतः उपाशी राहणारी अशा ठराविक साच्यातील आईची प्रतिमा चित्रपटात रंगवली जाते. पण आई हीसुद्धा एक हाडामांसाची जिवंत व्यक्ती आहे. तिला चांगल्या वाईट संवेदना आहेत. तिचा ठराविक स्वभाव आहे. तिला आवडीनिवडी आहेत. ही वस्तुस्थिती महत्त्वाची नाही का?

प्रत्येकआईआपल्याकुवतीनुसार,बुद्धीनुसार अपत्यांची काळजी घेत असते. संगोपन करते. कुठेही गेली तरी तिचा जीव लेकरांमध्ये गुंतलेला असतो. अपत्याच्या सुखासाठी ती शक्य असेल ते सारे करते. आई आणि मुले हे एकमेकांचे सर्वस्व असतात. निरपेक्ष प्रेम हे आईचे वैशिष्ट्य असते. त्यामुळे मायलेकांचे नाते हे सर्वोत्कृष्ट मानले आहे. मुलांच्या शिक्षणासाठी, प्रगतीसाठी, सुरक्षित भविष्यासाठी ती वैयक्तिकरित्या अनेक तडजोडी करते. ही प्रत्येक आईची गुणवैशिष्ट्ये आहेत. ती सर्वसामान्य आहेत, अंगभूत आहेत. पण अनेकदा, ती मुलांच्या अती लाडापोटी चुकतेसुद्धा. 'सुपरकीड'ची 'सुपरमॉम' बनण्याच्या हव्यासापोटी ती भरकटतेही. मुलांवर आपल्या अपेक्षांची ओझी लादून, त्यांचे बाल्य हिरावले जाते आहे, याचेही तिला भान नसते. मुलांचे बोट धरून चालताना, त्यांना वाढवताना ती सक्षम झाल्यावर एक क्षण असा येतो जेव्हा मुलांचे बोट अलगद सोडून त्यांना स्वातंत्र्य द्यायचे असते. मुलांचे विवाह झाले की आईच्या भूमिकेतून हलकेच अंग काढून घ्यायचे असते. पण ही समयोचित वागणूक अनेक आयांना जमतेच असे नाही. 'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे' ( कोणी लिहिले आहे देव जाणे) हे ब्रह्मवाक्यसुद्धा आईवर लादले जाते. मातेच्या भूमिकेतून तिने कधी बाहेरच येऊ नये असा 'सोयिस्कर बहमान' तिच्या गळी उतरवला जातो. आणि या अपेक्षांच्या दडपणाखाली, 'पुत्राचे सहस्त्र अपराध, माता काय मानी तयाचा खेद' असे म्हणत ती अपत्याचे लाड करते. त्याच्या चुका पोटात घालते. स्वतः झिजत राहते. आणि मग या आईचे काळीज प्रेयसीकडे घेऊन जाताना मुलगा ठेचकाळतो, तेव्हा 'तुला लागले तर नाही ना बाळा?' असा हुंकार त्या आईच्या काळजातून येतो. हे तर आईच्या उदात्तीकरणाचे अतिरेकी उदाहरण आहे. त्यावर अजून तडका मारणारी लोकप्रिय मालिका म्हणजे 'आई कुठे काय करते?' यातल्या अरुंधतीला 'महाराष्ट्रभूषण' नक्की मिळणार बघा. सध्याची मालिकेची लांबण बघता 'आई तू कशाला काही करते?' असे म्हणावेसे वाटते. वास्तविक, भारतीय संस्कृतीने 'मातृत्वा'चा गौरव केला आहे; 'आई' या मर्यादित व्यक्तिमत्त्वाचा नाही. मातृत्व ही एक उदात्त, उन्नत वृत्ती आहे. ती मानवी जीवनाची परमोच्च, उत्कट भावना आहे. सगळ्या संतांना त्यांचे परमभक्त 'माऊली' म्हणतात.

'विठु माझा लेकुरवाळा' या संत जनाबाईच्या अभंगातून किंवा 'बाप आणि आई, माझी विठ्ठल रखुमाई' या संत एकनाथांच्या अभंगातून प्रतित होणारे सर्वव्यापी, निरपेक्ष निर्मळ मातृत्व उच्च कोटीच्या संतांमध्ये प्राधान्याने दिसून येते. राणी कौसल्येला आदर्श मातृत्वाचे प्रतिक समजले जाते. पण हा बहुमान कैकेयीला का मिळाला नाही? कारण तिच्या मातृत्वाला स्वार्थ आणि मत्सराची किनार होती. महानायक श्रीकृष्णाची आई देवकी, पण श्रीकृष्ण वाढला तो यशोदेच्या वत्सल छायेत. अगदी प्रसिद्ध उदाहरणे बघायची तर फ्लॉरेन्स नाइटिंगेल, मदर टेरेसा, माता जिजाबाई, सिंधुताई सपकाळ यांचे वंदनीय मातृत्व कायम प्रेरणा देणारे आहे आणि महत्त्वाचे म्हणजे ही मातृत्व वृत्ती पुरुषातही असते तसेच आई होऊ न शकलेल्या स्त्रीच्या ठायीही असते. थोडक्यात काय, तर आई आणि मातृत्व वृत्ती यांच्यात गल्लत होऊ नये. स्त्री ही व्यक्ती म्हणून उत्तम असेल तर ती आई म्हणूनही उत्तमच असते. अविवेकी, अविचारी स्त्री असेल तर ती आईही तशीच असू शकते. स्त्री व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगिण मूल्यमापन केल्यानंतरच तिच्या 'आईपणाला' जोखणे गरजेचे आहे. म्हणूनच केवळ 'आई होणे' हे जीवनाचे सार्थक नाही तर जिजामातेसारखी मातृत्व वृत्ती असेल तरच शिवाजी घडतात. मुलांना सतत उपदेश देऊन, त्यांची तुलना करून, अनेक क्लासेसना पाठवून संस्कार होत नसतात. पालकांची दैनंदिन, प्रासंगिक वागणूक आणि कौटुंबिक वातावरण यातून संस्कार आपोआप झिरपतात. म्हणूनच म्हणावेसे वाटते, 'आई तू कशाला काही करते?' **

## वाचनीय आणि स्फोटक

# असोशींची भाषांतरे

**प्रा.शाम जोगळेकर**
**मो. ९२७३३४३१७७**

असोशींची भाषांतरे, हे विधिज्ञा शुभदा कुलकर्णी (छाया प्रभुणे) यांचे पुस्तक पुण्याच्या उत्कर्ष प्रकाशनाने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे.रेणू दांडेकर यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. असोशी म्हणजे मनातल्या ऊर्मी. कॉलेजमधल्या मैत्रिणीने या ऊर्मी खूप पूर्वीपासून जपल्या आहेत. ग्रेस, आरती प्रभू, पु .शि.रेगे, मर्ढेकर हे त्यांचे आवडते कवी. विशिष्ट फॉर्ममधील हे लेखन नसूनही ते मनात जपावेसे वाटते. शुभदा कुलकर्णी यांनीही आपले मनोगत मांडले आहे. आपल्या मनाशी चाललेला संवाद त्यांनी कागदावर उतरवला आहे. हे लेख म्हणजे स्वयंभू आणि स्वतंत्र भावबंध असल्याचे, त्यांनी नमूद केले आहे. प्रा.डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी या पुस्तकाला शुभेच्छा देताना, जीवनाकडे विलक्षण संयमाने आणि सकारात्मकतेने पाहण्याचा आशावादच कालच्या दुःखातून बाहेर पडण्यास साहाय्यभूत ठरतो, याची भावकोवळी जाणीव हे सदतीस ललितबंध आपणास करून देतील, असे म्हटले आहे या पुस्तकाचे रंगीत मुखपृष्ठ संदीप राशीनकर यांचे असून, त्यामुळे वाचक पुस्तक वाचण्यास प्रवृत्त होतो.




परतावा, या पहिल्या लेखातील विशिष्ट शैली वाचकाला चकित करते. लाभलेल्या आयुष्याविषयी लेखिकेची कोणतीही तक्रार नाही. जीवनाविषयी लेखिका कृतज्ञ आहे. जणु ही पुढील लेखनाची नांदीच आहे. त्यानंतरचे काही लेख विलक्षण गूढ स्वरूपाचे असून त्यामधून लेखिकेचे अगदी बालपणापासूनचे विविध अनुभव वाचकांसमोर उलगडत जातात. 'प्रसाद' हा लेख स्मरणरंजनात्मक आहे. काही अनुभव, विशेषतः तारुण्यातील, अजूनही अवीट गोडीचे वाटतात. काही शब्द ऐकल्यावर मनात असंख्य मोर नाचतात, हे अनुभव जणु ईश्वरशक्तीचा तो प्रसादच असावा, असेच लेखिकेला वाटते. त्यानंतरचे काही लेख अशाच प्रकारचे काहीसे स्मरणरंजनात्मक झाले आहेत. 'असाही एक पाऊस' हा लेख आठवणींचा जणु मुसळधार पाऊसच घेऊन येतो. विविध वयोगटातील व्यक्तींना पाऊस सुरू झाला की, काही गाण्यांची, गीतांची आठवण येतेच. भर पावसात बाहेर आणि मनात कोसळणारा पाऊस अनेक आठवणी घेऊन येतो. एक स्त्री म्हणून जाणवणारे तारुण्यातील आणि नंतरचे काही अनुभव लेखिकेने अतिशय तरल स्वरूपात उत्तम प्रकारे नोंदविले आहेत. जत्रा या सविस्तर लेखात लेखिकेने हनुमान जयंतीचा उत्सव आणि त्यानिमित्ताने घरोघरी होणारी तयारी यांचा उत्तम लेखाजोखा वाचकांसमोर ठेवला आहे. ग्रामीण भागात अनेक प्रथा कशा परंपरेच्या प्रभावातून पाळल्या जातात हे 'उभ्याचे नवरात्र' या लेखात वाचावयास मिळते. सकाळची शाळा, हा लेख ग्रामीण भागात शिकलेल्या स्त्री-पुरुषांना त्यांच्या, त्यावेळच्या दिवसांची आणि कष्टांची आठवण करून देईल. शेवटी लेखिका लिहिते, त्या चालण्याच्या कष्टाचे शैक्षणिकदृष्ट्या कितपत चीज झाले हे काही सांगता येणार नाही. पण चालण्याच्या सवयीमुळेच आजही आरोग्य उत्तम राहिल्याचे लेखिकेला जाणवते आहे. सगुणा, या अप्रतिम लेखात लेखिकेने आपले बाईपणाचे अनुभव नेमकेपणाने नोंदविले आहेत. आठवणीतील आई आणि नंतरच्या लेखात शुभदा यांनी विविध वेधक, वाचनीय आठवणी नोंदविल्या आहेत. आईपणाचा वसा, या लेखात लेखिकेने आईने घेतलेल्या कष्टांचा कृतज्ञतेने उल्लेख केला आहे. 'प्रवास शिक्षणाचा' हा लेख वकिलीचे शिक्षण घेताना, नांदत्या कुटुंबातील एक स्त्री म्हणून आलेले अनुभव लेखिकेने नेमकेपणाने नोंदविले आहेत. हे अनुभव खूप काही शिकवून गेले. अनेकांची दुःखे त्यामुळे जाणता आली आणि वकील व्यवसायामुळे त्यापैकी काही सोडविताही आली, असेही लेखिका कृतज्ञतेने नमूद करते. मुलीसाठी, या लेखात पहिल्यावेळीसुद्धा मला मुलगीच व्हावी असे वाटत होते, असे लेखिका नमूद करते. मात्र सासूबाईंचे मत वेगळे होते. पहिला मुलगा असावा या आग्रहामुळे लेखिकेला त्यांचा राग यायचा. मुलानंतर मुलीच्या वेळी गरोदरपणाचा आनंद मी पूर्णपणे अनुभवला, असेही नंतर शुभदा यांनी नमूद केले आहे. आमच्या मनीमाऊ, बैलपोळा हे लेख पुन्हा लेखिकेला जुन्या आठवणींत नेतात. आपल्या समाजातील अजूनही टिकून राहिलेली, स्त्री- पुरुष विषमता या पुस्तकातील शेवटच्या वाक्यातून ठळकपणे व्यक्त होते आहे. पोळ्यादिवशी सजलेले, वेसण मालकाच्या हातात असलेले बैल भलेही प्रेक्षणीय, पूजनीय शक्तीचे प्रतीक असतीलही. पण या बैलांची वेसण अजूनही स्त्रीच्या हातात आलेली नाही आणि येणारही नाही. मलपृष्ठावर ॲड. शुभदा कुलकर्णी यांच्या छायाचित्रासह, प्रकाशित साहित्याविषयी त्यांचे मनोगत वाचावयास मिळते. हे पुस्तक प्रौढ स्त्री-पुरुषांना त्यांच्या गतजीवनाची आठवण करून देते आणि वाचक अंतर्मुख होतो, हेच या पुस्तकाचे यश आहे. **

**पुस्तकाचे नाव : असोशीची भाषांतरे**
**लेखिका : ॲड. शुभदा कुलकर्णी**
**प्रकाशक : उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना पुणे -४. ८६२३९८९७७१**
**पहिली आवृत्ती : ५.११.२०२१**
**पृष्ठे :१११. किंमत : रु.२००/-**

# तोल ढळतोय!


**शशिकांत मुद्देबिहाळकर**
**९७६७१५२६०८**

खरंतरं,हे वयं नव्हे तोल ढळण्याचं.पण गेले काही दिवस शरीर चालता चालता डाव्या बाजुला झुकल्यासारखं वाटतंय, नाही खरंच झुकतेय. खरंतर, राजकारणाचा माझा काडीमात्र संबंध नाही, माझं मन स्थिर आहे, मग शरीराचं हे डाव्या बाजूला झुकणे का? मला कळत नाही. रस्त्याने नाकासमोर चालणारा पादचारी मी ! हे डाव्या बाजूला झुकणे म्हणजे अपघाताला निमंत्रण.

वाङ्मयी रूक्मिणीचे हे अढळ स्थान! शरीर, दोषाने तिकडे अतिक्रमण करणेही महापाप. पण ही व्यथा संपण्याची चिन्हे नाहीत हे लक्षात घेऊन वैद्यराजांना शरण जाण्या वाचून मार्ग राहिला नाही तेव्हा मुंबई पुणे पालथे घालून वैद्यराजांना गाठले. शरीराचा तोल का ढळतोय हे पाहण्यासाठी चिकित्सा करून घेतली. एका स्वयंचलित भुयारात (त्याला एमआरआय असे काहीतरी म्हणतात) डोके खुपसून मेंदूतील बिघाड राजवैद्यांनी तपासला. अगणित स्वयंचलित प्रहार करून छायाचित्रे काढून तपासली. अखेर डाव्या बाजूचे सरकण्याचे निदान वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाले. रक्त पुरवठा कमी होत होता की काय असे दिसून आले.जग सगळे उजव्या बाजुच्या जाण्याच्या वाटेने निघाले असताना माझ्या शरीराने हा डाव्या वाटेचा मार्ग का अनुसरावा कळेना.

असो वैद्यराजांनी मार्ग तर शोधून काढला. बरे झाले. मग वैद्यराजांनी काही गोळ्या,औषधे दिली. ती घेतल्यावर आपोआप शरीराने डाव्या बाजुस झुकण्याचा मार्ग बंद केला. आता रस्त्यावरून चालताना नाकासमोरच्या रस्त्याने अगदी सरळ चालता येऊ लागले. मेंदूचे शरीरावरील नियंत्रण किती आश्चर्यचकित करणारे असते नाही का? दुखणे कुठे असते आणि त्याच्यावरील उपाय,कुठे सापडतो.

गंमत असते, आपल्याला ते शोधून सापडणार नाही एवढे खरे. त्यासाठी वैद्यराजांना गाठावे लागणार. नाही तरी वाम मार्गाकडे झुकणे बरे नव्हेच हे कुणीतरी रोखायला हवेच मग ते शरीराचे असो की वागण्याचे. कसे. **



# विवाह करताय ; चांगला विचार करा



**अंकुश शिंगाडे**

अलिकडे न्यायालयात घटस्फोटाचे खटले दाखल होत आहेत. खटले वाढत असून निकालाच्या मानानं खटल्याची संख्या जास्त आहे. या खटल्यातील वादाचा विषय असते सासू. सासू मोठी खास्ट आहे असं कारण पुढं करीत न्यायालयात खटले दाखल होत असतात. तसं पाहता अलिकडील काळ बदललेला आहे व काही काही घरात सासवांना बराच त्रास सहन करावा लागत आहे.

पूर्वीचा काळ असा नव्हता. त्या काळात सासवा बदमाश असत असं आजच्या काळातील लोकांचं म्हणणं. परंतु त्या काळातीलही अपवादात्मक दोनचार जर सोडल्या तर काही सासवा खऱ्याच चांगल्या होत्या. मग सासवा खास्ट असतात. त्या चांगल्या नसतात असा सासवांचा इतिहास बदनाम करणारा का पुढे आला असावा? त्याचं कारण होतं बालविवाह.

आई......आपली आई आपल्याला प्रिय असते. कारण ती आपली आई असते. त्यातच तिनं आपल्याला कितीही त्रास दिला तरी तो त्रास आपल्याला त्रास दिल्यासारखा वाटत नाही. कारण ती आपली आई असते. एखाद्या वेळेस आपण आपल्या आईचं एखादं काम जर केलं नाही तरी आई रागावते व आपल्याला मारते. तेव्हा आपल्याला तिचा तात्पुरता राग येतो. मग काही वेळानं तो राग आपण विसरुन जातो. त्याचा राग आपण आपल्या मनात धरुन ठेवत नाही. परंतु त्याचवेळेस जर ती आपली आई नसेल, दुसरं कुणीही असेल आणि ती व्यक्ती आपल्यावर कितीही प्रेम करीत असेल तरी त्या व्यक्तीचा आपल्याला राग येतो. तीच गोष्ट पूर्वी आपल्याला सासवांच्या बाबतीत घडून आलेली दिसते. पूर्वी बालविवाह व्हायचे व ते बालवय असायचं आणि त्या बालवयात विवाह व्हायचे. तसं पाहता त्या बालवयात तसे बालविवाह झाल्यानंतर ते खेळण्याबागडण्याचं वय असतांना सासू तिला घरची कामं सांगायची नव्हे तर ती कामं करीत असतांना जर ती चुकलीच तर तिला ती समजावून सांगायची. त्यातच ती अशी कामं करीत असतांना ती सारखी चुकत असेल तर तिला रागवायची. तसं त्या सुनेचं वय,लहान असल्यानं तिला ते मारायचीही. जशी आजची आपली आई आपल्याला मारते तशी. तसं पाहता त्या सासुनं तसं मारताच तिला राग यायचा. जसा आजच्या काळात आपल्याला कोणी मारत असेल तर राग येतो तसा. याच रागावरुन व मारण्यावरुन सासू बदनाम झाली पूर्वीच्या काळी. काही दिवस जाताच हे मारणे जेव्हा ती समजदार होत असे. तेव्हा लक्षात येत असे व तेव्हा तीव्र राग मनात राहात असे.

आज काळ बदलला. या बदलत्या काळानुसार सासू सुनेच्या व्यवहारात बदल झाला. सासू सून झाली व सून सासू. आता सासूवर सून अत्याचार करती झाली. परंतु ज्या घरातील मुलगा आपल्या आईवर आपल्याच पत्नीकडून होणारा अत्याचार सहन करु शकला नाही. तेव्हा वाद झालेत व असे वाद झालेत की ज्याचं रुपांतरण चक्क घटस्फोट व न्यायालयातील खटल्यात झालं. कारण कायद्याचं अलिकडील काळात पत्नीला अभय दिलं गेलं आहे.

कायदे बनले हे अभ्यास करुनच. परंतु ते कायदे बनवताना कदाचीत घराघरातील परिस्थिती लक्षात घेतलेली नसावी. वरवर परिस्थिती पाहून कायदे बनले असावेत. कारण प्रत्येक घरातील परिस्थिती सारखी नसते. काही घरात प्रेम असतं तर काही घरात प्रेम, जिव्हाळा याला थारा नसतो. उदाहरणार्थ एखादी सावत्र आई एखाद्या बाळाला स्वतःच्या मुलासारखी वागणूक देवू शकते. तर काही सावत्र आई काही काही बाळांना सावत्रपणाचीच वागणूक देत असतात. हे नाकारता येत नाही. तेच घडलं असेल कायदे बनवितांना. कायदे बनले देशातील विपरीत परिस्थिती पाहूनच. त्याचा सखोल अभ्यास केला त्यांनी. परंतु असा सखोल अभ्यास करीत असतांना प्रत्येक घरातील वातावरण वेगळं असते याची जाणीव न ठेवून कायदे बनल्यानं आज घराघरातील वातावरण तंग अशा स्वरुपाचं आहे व आज अशाच तंग वातावरणातून आलेल्या गैरसमजुतीतून न्यायालयात खटले दाखल होत आहेत व त्या खटल्यात वाढ होत आहे.

महत्वपूर्ण गोष्ट ही की प्रत्येक सुनेनं आज आपल्या सासूला समजून घेण्याची गरज आहे. तिनं तिला आपली आईचं मानावं. तिला बदनाम करु नये. कारण आज तो काळ गेला की ज्या काळात बालविवाह होत व अगदी अल्पवयात घरी आलेल्या मुलीला सर्व करतब शिकविण्याचे काम सासू नावाची त्या काळातील आई शिकवीत असे. ती तिला सर्व गोष्टीत पारंगत करीत असे. जो साधारण आजच्या काळातील महिलांना अत्याचार वाटत असतो. आज त्याच महिलेनं समजून घ्यावं आपल्या सासूला. तसं पाहता आज काळ बदलला नाही. काळ तोच आहे. फरक एवढाच आहे की आजच्या काळात

महिलांचे बालविवाह होत नाहीत व आजच्या काळात जे विवाह होतात. ते विवाह ती समजदार झाल्यावर होतात. त्यामुळं सासू जर एखादी चांगली गोष्ट सांगत असेल तर ती आपल्याला सहजासहजी स्वीकारता येत नाही. स्वीकारण्यात समस्या निर्माण होतात. म्हणूनच घटस्फोट, अत्याचार ह्या साऱ्या कटकटी वाटतात. कारण आजच्या काळात वय वाढलेले आहे विवाहाचे व या वाढत्या वयात आपलं काहीही चुकत असल्यास वा त्यावर कोणीही काही सूचना करीत असल्यास त्या सूचना आपल्याला आवडत नाहीत. त्या सूचना वारंवार केल्यास आपल्याला राग येतो व तशी आपल्याला आपल्याच हितासाठी कोणी अक्कल सुचविलेली आवडत नसल्यानं आपली भांडणं होत असतात.

नवीन सून, मग ती कितीही वयाची का असेना, घरामध्ये नवीनच नांदायला येतांना तिला तसा फारसा अनुभव नसतोच. तो अनुभव सासूला नक्कीच असतो. शिवाय नवीन घर. नवनवीन व्यक्ती, नवीन परीसर, नवीन शेजारी, रोजच नवनवीन लोकांशी येणारा संपर्क हा नवीनच असतो व त्या लोकांशी जुळवून घेणे ह्या गोष्ट काही एकाच दिवशी शक्य होत नाहीत. त्यासाठी बराच कालावधी जावा लागतो. परंतु आपला स्वभाव हा उतावीळ असतो. तो उतावीळ बनलेला असतो. कारण आपल्या मायबापानं आपले फारच लाड पुरविलेले असतात. शिवाय अशा उतावीळ स्वभावाने त्या नवीनच वातावरणात आपण स्वतःला दिडशहाणे समजत असल्यानं व आपल्या मायबापानं तसं आपल्याला सांगितलं असल्यानं आपल्यासमोर नवीन लोकांनी काही सुचविलेलं आपल्याला खपत नाही व ती सूचना करणे म्हणजे आपल्याला अत्याचार वाटतो. त्यातूनच घटस्फोटासारखे प्रसंग निर्माण होत असतात. विशेष सांगायचं म्हणजे आपले वय जरी वाढले असेल अन् वाढत्या वयात आपण समजदार जरी झालो असेल तरी आपण स्वतःला शहाणे समजू नये. तरच संसार टिकतो. आपण समजदार असल्यानं आपल्यावर कोणीही आजच्या काळात अत्याचार करु शकत नाहीत. काही जण सूचनाही करतात. त्या सुचना समजून घ्याव्या. त्याचा बाऊ करु नये. तरच संसार टिकेल. तसा तो टिकवावा. अन् ज्याला तसं वागायचं नसेल. संसार टिकवायचा नसेल, तर त्याचा त्यांनी आधीच विचार करावा. त्यानं विवाहही करु नये व संसारात पडू नये. व्यतिरिक्त संसारात पडून कुणाचं जीवन उध्वस्त करु नये म्हणजे झालं. **

निवडक

## साई सुदर्शनचा भन्नाट रेकॉर्ड

**अहमदाबाद :** चेन्नई आणि गुजरात यांच्यात शुक्रवारी अहमदाबादेत सामना झाला. या सामन्यात गुजरातने चेन्नईवर ३० धावांनी दणदणीत विजय मिळवला. चेन्नईच्या गोलंदाजांचा शुभमन गील आणि साई सुदर्शन यांनी अक्षरशः धुव्वा उडवला. साईने तर ५१ चेंडूत १०३ धावांची खेळी करत शतक साकारले. या खेळीमुळे त्याने एक खास रेकॉर्डही बनवला. आयपीएलच्या इतिहासात आता सर्वात जलद १००० धावा पूर्ण करणारा तो क्रमांक १चा भारतीय खेळाडू ठरला आहे. या बाबतीत साईने सचिन तेंडुलकरलाही मागे टाकले आहे.

## पिकलबॉल लीग सुरू

**नवी दिल्ली :** भारतात रॅकेट स्पोर्ट्सचा विस्ताव वाढतोय आणि रॅकेट स्पोर्ट्सवर प्रेम करणाऱ्या खेळाडूंसाठी एक आनंदाची बातमी आहे. नाटेकर स्पोर्ट्स अँड गेमिंग आणि सोनी एंटरटेनमेंट टॅलेंट व्हेंचर्स इंडिया यांच्या संयुक्त विद्यामाने पहिल-वहिली व्यावसायिक पिकलबॉल लीग सुरू करण्यात येत आहे. ही गौरव नाटेकर आणि त्यांची पत्नी आरती पोनप्पा नाटेकर ज्या टेनिसमधील भारताच्या माजी नंबर १ च्या खेळाडू आहेत, त्यांच्याद्वारे प्रमोट केलेली कंपनी आहे.

## पुनियाच्या आशांना सुरुंग

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय उत्तेजकविरोधी संघटनेकडून काही दिवसांपूर्वी निलंबनाची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर आता भारताचा अनुभवी कुस्तीपटू बजरंग पुनियाचा पाय आणखीनच खोलात गेला आहे. जागतिक कुस्ती संघटनेकडूनही त्याला निलंबित केले असून या वर्षअखेरीसपर्यंत त्याच्यावरील निलंबन कायम राहणार आहे. यामुळे पॅरिस ऑलिंपिकमध्ये प्रवेश करण्याच्या त्याच्या आशांना सुरुंग लागला आहे. उत्तेजक नमुना चाचणीला नकार दिल्यामुळे नाडाकडून पुनियाच्या निलंबनाच्या शिक्षेचा कठोर निर्णय घेण्यात आला.

## राहुल द्रविडचा पत्ता कट?

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्यामुळे भारतीय संघाच्या नवीन प्रशिक्षकासाठी बीसीसीआय लवकरच अर्ज प्रक्रिया सुरू करू शकते. त्यानंतर राहुल द्रविडच्या जागी नवीन प्रशिक्षकाची निवड केली जाईल. याचदरम्यान बीसीसीआयचे सचिव जय शहा यांचे वक्तव्य समोर आले आहे. जय शहा म्हणाले की, भारतीय मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांना कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षकपदावर राहायचे असेल तर त्यांना पुन्हा अर्ज करावा लागेल.

## गुकेशचे झोकात पुनरागमन

**पोलंड :** जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आव्हानवीर असलेल्या डी. गुकेश याने सुपरबेट जलद व ब्लिटझ् बुद्धिबळ स्पर्धेमध्ये झोकात पुनरागमन केले. पहिल्या दिवशी निराशाजनक कामगिरी केल्यानंतर गुकेशने शुक्रवारी भारताच्याच आर. प्रज्ञानंद व जर्मनीच्या विन्सेट केमर यांच्यावर दमदार विजय संपादन केले. जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनला बरोबरीत रोखण्यातही त्याला यश मिळाले. डी. गुकेशला पहिल्या दिवशी दोन लढतींत पराभव सहन करावा लागला होता.

# शीतल ठरली 'मिसेस यूएई'



**। पनवेल । वार्ताहर ।**

**दुबईत बिइंग मुस्कान इव्हेंट्सने आयोजित मिसेस यूएई इंटरनॅशनल २०२४ स्पर्धेत नवी मुंबईच्या व्यायवसायिका शितल भटनागर यांनी अव्वल स्थान मिळवत नवी मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. दुबईतील प्रतिष्ठित अशा रामी ड्रीम हॉटेलमध्ये हा सोहळा पार पडला. भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला शितल भटनागरच्या यांच्या विजयाने सर्वच स्तरांमध्ये त्यांचे कौतुक केले जात आहे.**

नवी मुंबईतील शितल भटनागर या दागिन्यांचा व्यवसाय करत असून आपल्या कामाबरोबरच त्या शारीरीक तसेच मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी देखील तितक्याच प्रयत्नशील असतात. भरतनाट्यमपासून ते साल्सा असे विविध नृत्यप्रकार त्यांना अवगत आहेत. त्याचबरोबर शारीरीक बळकटीसाठी आणि स्वसंरक्षणासाठी त्यांनी तायक्वांदोचे देखील प्रशिक्षण घेतले आहे.

शितल भटनागर सांगतात की, मिसेस यूएई इंटरनॅशनल २०२४चा मुकुट मिळाल्याने तसेच अशा प्रतिष्ठित व्यासपीठावर मला माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली याचा मला अभिमान आहे. हा विजयाचा पल्ला गाठण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाची अधिक गरज असते. सर्वच महिलांना स्वप्नं पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्याचा हक्क आह. फक्त त्यासाठी एक ठराविक ध्येय उराशी बाळगणे गरजेचे आहे. मुस्कान इव्हेंट्स ही युएईमधील आघाडीची अशी स्पर्धा आयोजन करणारी संस्था आहे जी मिस्टर युएई इंटरनॅशनल, मिस युएई इंटरनॅशनल आणि मिसेस युएई इंटरनॅशनल यासह सर्वात प्रतिष्ठित स्पर्धांचे आयोजन करते. मीना असरानी या बिइंग मुस्कान इव्हेंट्सच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. हजाराहून अधिक प्रवेशिका प्राप्त झाल्यामुळे स्पर्धा अटीतटीची होती. अंतिम टप्प्यात १७ स्पर्धकांची निवड करण्यात आली.

यात मानसी शाह (सिटी वन टुरिझम अँड ट्रॅव्हल), मनोज शेट्टी (फॅशन इंडस्ट्रीतील एक प्रसिद्ध नाव), गौतम बंगेरा (व्यवसाय उद्योजक), नेहा सिल्वा (पेजंट ग्रुमर आणि इव्हेंट्स) दर्शन शाह (एन गोपालदास ज्वेलर्स), नेहा शर्मा (अभिनेता, मॉडेल आणि इन्फ्लुएन्सर), आणि प्रा. आदिल मतीन (वेटेल टीव्हीचे अध्यक्ष) यांचा समावेश असलेल्या ज्युरी पॅनेलसाठी निकाल आव्हानात्मक ठरला. विशेष म्हणजे, हा कार्यक्रम शेखा फातिमा बिंथाशर बिन दालमोक अल मकतूम यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. तसेच, या कार्यक्रमाला प्रतिष्ठीत मान्यवर व्यक्ती आणि दुबईतील उद्योगपती राज शेट्टी (रमीचे संस्थापक, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय कार्यकर्ता) यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. यावेळी एच.ई. लैला राहाल, अली मोहम्मद अल माझेम, याकूब अल अली, अब्दुलअजीज अहमद, हरज्योत ओबेरॉय बोहरा, झुबेर सारूख, गौरी सिंग, सादिक अहमद, डॉ. मिर्ना युनेस, रोमेन गेरार्डिन-फ्रेस आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## इंग्लंडची तोफ थंडवणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडचा महान वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याच्या तयारीत आहे. ब्रेंडन मॅक्क्युलम नुकताच यूकेच्या पाच दिवसांच्या दौऱ्यावर होता. मॅक्युलमने अँडरसनला प्रत्यक्ष भेटण्यासाठी न्यूझीलंड ते यूकेला प्रवास केला. येथील गोल्फ सामन्यादरम्यान मॅक्क्युलमने अँडरसनला स्पष्ट केले की संघ भविष्याकडे पाहू लागला आहे. अँडरसनने आपल्या कारकिर्दीत अनेक मोठे विक्रम केले आहेत. कसोटीक्रिकेटमध्येसर्वाधिक विकेट घेणारा तो जगातील तिसरा गोलंदाज ठरला आहे. अँडरसनचे वय ४१ वर्षे आहे आणि जुलैमध्ये तो ४२ वर्षांचा होईल. त्यावेळी इंग्लंडचा संघ वेस्ट इंडिजविरुद्ध तीन सामन्यांची मालिका खेळणार आहे. श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेनंतर तो निवृत्तीची घोषणा करू शकतो.

## शुभमन गिलला मोठा झटका

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

आयपीएलमध्ये शुक्रवारी गुजरात आणि चेन्नई यांच्यात सामना रंगला होता. या सामन्यात गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्जचा ३५ धावांनी पराभव केला. या विजयासह गुजरात टायटन्सने प्लेऑफमध्ये जाण्याच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. दरम्यान, बीसीसीआयने गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलला मोठा झटका दिला आहे. खरं तर, शुक्रवारी मोदी स्टेडियम वर चेन्नई विरुद्ध इंडियन प्रीमियर लीगच्या सामन्यादरम्यान स्लो ओव्हर रेट राखल्याबद्दल शुभमन गिलला त्याच्या मॅच फीच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. बीसीसीआय आणि आयपीएलने दंडाची पुष्टी करणारे एक निवेदन जारी केले की, हे लक्षात घेता आयपीएलच्या आचारसंहितेअंतर्गत हा संघाचा हंगामातील दुसरा गुन्हा होता, जो स्लो ओव्हर रेटच्या उल्लंघनाशी संबंधित आहे. त्यामुळे या उल्लंघनाचे गांभीर्य लक्षात घेऊन गिलला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. याव्यतिरिक्त आयपीएल नियमांनुसार, उर्वरित सदस्यांना वैयक्तिक ६ लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के दंडाचा सामना करावा लागला. अशा परिस्थितीत आता गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात संघाने पुन्हा एकदा या नियमाचे उल्लंघन केल्यास गिलवर एका सामन्याची बंदी घालण्यात येईल.



# करारातून वगळण्याचा निर्णय समितीचा



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रेयस अय्यर आणि ईशान किशन यांना बीसीसीआयच्या वार्षिक करारातून वगळण्याचा सर्वस्वी निर्णय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांचा होता, असा खुलासा बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी केला. मात्र, नियमाची चौकट कोणालाही मोडता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत खेळणे प्रत्येकाला बंधनकारक आहे, असे बीसीसीआयने जाहीर केले होते. मात्र, भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वकरंडक स्पर्धे नंतर ईशान किशनने दौऱ्यावर असताना आपल्याला विश्रांतीची गरज असल्याचे सांगितले. त्यानंतर तो इतर कार्यक्रमांत दिसत होता. झारखंड संघातून खेळण्यापेक्षा त्याने आयपीएलच्या तयारीसाठी हार्दिक पंड्यासह सराव करणे पसंत केले होते.

मुंबईचा खेळाडू असलेल्या श्रेयस अय्यरने आपल्याला दुखापत झाल्याचे सांगत रणजीतून खेळणे टाळले होते; परंतु त्याला कोणतीही दुखापत नसल्याचे बंगळूरमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीतून स्पष्ट करण्यात आले होते. मुंबईचा उपांत्यपूर्व रणजी सामना बीकेसी (वांद्रे) येथे सुरू असताना अय्यर ब्रेबॉर्न स्टेडियममध्ये कोलकता नाईट रायडर्स संघाच्या सरावात दिसून आला होता. बीसीसीआयने कारवाईचा बडगा उगारल्यानंतर अय्यर रणजी उपांत्य आणि अंतिम सामन्यात खेळला होता.

निवड समितीतील कोणतेही निर्णय मी घेत नाही, मी त्या बैठकीत केवळ निमंत्रित म्हणून असतो. तसेच, श्रेयस आणि ईशान यांना वार्षिक करारातून वगळण्याचाही निर्णय अजित आगरकर आणि त्यांच्या निवड समितीने घेतला आहे. त्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे माझे काम आहे, असे शहा यांनी सांगितले. हार्दिक पंड्याबाबत वेगळा न्याय का, असा प्रश्न विचारला असता शहा म्हणाले, हार्दिकने विजय हजारे आणि मुश्ताक अली या राष्ट्रीय एकदिवसीय आणि टी-२० स्पर्धेत खेळणार असल्याचे सांगितले आहे.

## इम्पॅक्ट खेळाडूचा नियम प्रायोगित

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

इम्पॅक्ट खेळाडूच्या नियमाचे हे दुसरे वर्ष आहे; परंतु यंदा या नियमावर रोहित शर्मासह अनेकांनी टीका केली आहे. त्यामुळे अष्टपैलू खेळाडूचे महत्त्व कमी झालेले आहे. तसेच, सहजतेने अडीचशेपेक्षा अधिक धावा होत आहेत. परिणामी या नियमाचा फेरविचार करावा, अशी मागणी केली जात आहे. हा नियम आम्ही केवळ चाचणी करण्यासाठी आणला होता. त्यामुळे दोन भारतीय खेळाडूंना मैदानावर खेळण्याची संधी मिळत आहे. मात्र, आता त्याचे परिणामही दिसून येत असल्यामुळे सर्व संबंधितांशी चर्चा करून पुढील निर्णय घेऊ, असे शहा यांनी सांगितले.

# पुण्याच्या आकाशची 'सुवर्ण' कमाई



**। पुणे । प्रतिनिधी ।**

कझाकस्तानमध्ये अस्ताना येथे झालेल्या २२ वर्षांखालील युवा आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत पुण्याच्या आकाश गोरखाने सुवर्णपदकाची कमाई केली. या स्पर्धेत २२ वर्षांखालील गटात निर्विवाद वर्चस्व राखणाऱ्या भारताने या गटातील २१ पदकांबरोबरच एकूण ४३ पदकांची कमाई केली. यातील एक पदक पुण्याच्या आकाश गोरखाचे होते. त्याने ६० किलो गटाच्या अंतिम फेरीत कझाकस्तानच्या रस्लन कुझेउबाएवचा गुणांच्या विभागणीत ४-१ असा पराभव करून विजेतेपद मिळविले.

आकाश गोरखाने सातत्याने मेहनत घेत स्वतःला आशियाई सुवर्णपदकापर्यंत आणले. आकाश गोरखाने वयाच्या १६व्या वर्षी प्रशिक्षक उमेश जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सरावास सुरवात केली. गेल्या वर्षी गोवा येथील राष्ट्रीय स्पर्धेत त्याने रौप्यपदक मिळविताना अंतिम लढतीत भारताच्या ऑलिंपियन आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या मनीष कौशिकला झुंजविले होते. त्यानंतर आंतरसेनादल राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले. सेनादलाचेच प्रतिनिधित्व करताना आकाश गोरखाने मेघालयात झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले तर आता त्याने आशियाई जेतेपद पटकावले आहे. लष्करी क्रीडा संस्थेत सराव करताना जयसिंग पाटील यांनी आकाश गोरखाला घडवले.

## नीरजचे अव्वल स्थान हुकले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नीरज चोप्राने दोहा डायमंड लीग स्पर्धेत ८८.३६ मीटर भालाफेक करत चांगली सुरूवात केली. मात्र, टोकियो ऑलिम्पिकमध्ये सिल्वर मेडल जिंकणाऱ्या जेकब वडेलिच ८८.३८ मीटर भालाफेक करत अव्वल स्थान पटकावले. नीरजचे अव्वल स्थान अवघ्या २ सेंटीमीटरने हुकले. टोकियो ऑलिम्पिकमध्ये नीरजने गोल्ड मेडल मिळवलं होते. मात्र, दोहा डायमंड लीगमध्ये जेकब वडेलिचने नीरजला मागे टाकले. नीरज जरी दोहा डायमंड लीगमध्ये दुसऱ्या स्थानावर असला तरी नीरजने आपला बेस्ट थ्रो दिला. त्याने ८८.३६ मीटर भालाफेक करत आपले सर्वोत्तम प्रदर्शन केले. नीरजसोबत सहभागी झालेला भारताचा किशोर जेना हा भालाफेकपटू दहा पैकी नवव्या स्थानावर राहिला.



# चेन्नईची प्लेऑमधील वाटचाल खडतर



**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

सामन्यापूर्वी तळाच्या स्थानावर असलेल्या गुजरातने गतविजेत्या चेन्नईची प्लेऑमधील वाटचाल खडतर केली आहे. शतकवीर शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांच्या द्विशतकी सलामीच्या जोरावर २३१ धावा उभारणाऱ्या गुजरातने चेन्नईचा ३५ धावांनी पराभव केला. या पराभवानंतरही चेन्नईचा संघ चौथ्या स्थानावर कायम राहिला असला तरी प्लेऑफसाठी त्यांना उर्वरित दोन्ही सामन्यात विजय आवश्यक आहे. अहमदाबादच्या याच मैदानावर गतवर्षी गुजरातचा पराभव करुन चेन्नईने पाचवे आयपीएल विजेतेपद मिळवले होते. यावेळी मात्र त्यांची गोलंदाजी सफशेल अपयशी ठरली.

२३२ धावांचे लक्ष्य पार करण्यासाठी धडाकेबाज सलामी आवश्यक होती, परंतु चेन्नईची ३ बाद १० अशी अवस्था झाली. त्यानंतर मिचेल आणि मोईन यांनी अर्धशतके करत १०९ धावांची भागीदारी करुन पाठलाग कायम ठेवला होता. मोहितने या दोघांनाही बाद केल्यावर धोकादायक दुबेचीही विकेट मिळवली आणि चेन्नईचा पराभव निश्चित केला. चेन्नईने नाणेफेक जिंकून गुजरातला प्रथम फलंदाजी दिली, पण हा निर्णय चुकल्याचे काही षटकांतच त्यांच्या लक्षात आले कारण १७.२ षटकानंतर त्यांना पहिले यश मिळाले आणि तोपर्यंत गुजरातचे सलामीवीर गिल व साई यांनी २१० धावांचा झंझावात सादर केला होता. चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाडचे सर्व पयत्न फोल ठरत होते. चौकार-षटकारांची आतषबाजीच या दोघांकडून सुरु होती.

# पाकिस्तान संघाचे आर्मी प्रशिक्षण फेल



**। डब्लिन । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान संघाने गेल्या सहा महिन्यांत केवळ कोच, कर्णधारच नाही तर निवडकही बदलले आहेत. आणि टी-२० विश्वचषकाच्या तयारीसाठी पाकिस्तानच्या क्रिकेट संघाने आर्मी स्कूलमध्ये प्रशिक्षण घेतले. मात्र, संघाची स्थिती जैसेथेच आहे. टी-२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तानला आयर्लंडकडून दारूण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. शुक्रवारी डब्लिनमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात आयर्लंडने एक चेंडू बाकी असताना ५ विकेट्सने शानदार विजय नोंदवला. या सामन्यात पाकिस्तानचे स्टार गोलंदाज आयर्लंडच्या फलंदाजांसमोर हतबल दिसले.

या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात १८२ धावा केल्या होत्या. कर्णधार बाबर आझमने ५७, तर सैम अयुबने ४५ धावा केल्या. इफ्तिखार अहमदने ३७ आणि शाहीन आफ्रिदीने १४ धावा केल्या. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या आयरिश संघासमोर पाकिस्तानच्या स्टार गोलंदाजांनी पाणी मागायला सुरुवात केली. शादाब खान चांगलाच महागात पडला. त्याने ४ षटकात ५४ धावा दिल्या. आणि त्याला विकेट पण मिळाली नाही. नसीम शाहने ४ षटकात ३७ धावा दिल्या. पण नसीमला एकच विकेट मिळाली. तर शाहीन आफ्रिदीने ४ षटकात २६ धावा दिल्या, मात्र त्याला एकच यश मिळू शकले. इमाद वसीमने एक विकेट तर अब्बास आफ्रिदीला २ बळी मिळाले, पण तेही खूप महागडे ठरले.

### ■ लिंबू टिंबू संघासोबत लाजिरवाण पराभव

# क्षितिजाची फॉरेन एक्सपोजरसाठी निवड

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

***भारतीय खेल प्राधिकरणच्यावतीने फॉरेन एक्सपोजर निवड चाचणी लखनऊ येथे मंगळवारी (दि.७) संपन्न झाली. या निवड चाचणीत देशभरातून भारतीय खेल प्राधिकरण सराव केंद्रात सराव करणाऱ्या राज्य व राष्ट्रीय पदक विजेत्या महिला कुस्तीपटूंनी विविध वजन गटात सहभाग नोंदवला होता.***

*या आयोजनातून अंतिमतः १२ महिला कुस्तीपटू निवडण्यात आले असून त्यांना पुढील ॲडव्हान्स ट्रेनिंगसाठी युरोपमधील रोमानिया देशात पाठविण्यात येणार आहे. अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे रायगड जिल्ह्यातील खोपोलीची राष्ट्रीय पदक विजेती खेळाडू क्षितिजा जगदीश मरागजे हिने ५० ते ५४ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.*

*क्षितिजा ही कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुल खोपोली येथे सराव करत असताना खेल प्राधिकरणाच्या एसएआय कांदिवली (मुंबई) येथे सराव केंद्रात तीची निवड झाली होती. आणि तेथूनच आता तीची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रशिक्षणासाठी निवड झाली.*

*यावेळी प्रशिक्षक राजाराम कुंभार, महाराष्ट्र शासनाचे राज्य कुस्ती मार्गदर्शक संदीप वांजळे, विजय चव्हाण, दिवेश पालांडे, ओमकार निंबळे, रोशनी परदेशी आणि लीली पॉल आणि डॉ. सुनील पाटील यांनी क्षितिजा शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच, छत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते पै मारुती आडकर, खोपोली शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत, खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र आतनूर यांनी क्षितिजाचे विशेष कौतुक केले आहे.*




## ब्रिजभूषणवरील आरोप निश्चित

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या स्थानिक न्यायालयाने भाजपचे नेते आणि भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्याविरूद्ध पाच महिला कुस्तीपटूंचे लैंगिक शोषण केल्याचे आरोप निश्चित करण्यासाठी हिरवा कंदील दाखवला आहे. दिल्ली कोर्टाने ब्रिजभूषणविरूद्ध विनयभंगाचा देखल गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिले आहे. दिल्ली कोर्टाने सांगितले की, ब्रिजभूषणविरूद्ध आरोप निश्चित करण्याइतके सबळ पुरावे आहेत. मात्र, याचबरोबर सहाव्या महिलाकुस्तीपटूने केलेल्या आरोपांमधून कोर्टाने ब्रिजभूषणची निर्दोष मुक्तता केली आहे.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)